# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग - दोन

## गुरुवार, दिनांक १५ ऑक्टोबर, २०२६ / अश्विन २३, १९४८ (शके)

**१३५. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण :-**

विधानसभेचे सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजी विधान भवन, नागपूर येथे सुरु होऊन रविवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या तृतीय सत्रात एकूण २२९ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. त्यापैकी १७७ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आलेली होती. ५२ निवेदनांपैकी १३ निवेदने सोमवार, दिनांक २७ एप्रिल, २०२६ रोजीच्या पत्रक भाग-दोन क्रमांक ७१ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. **३९** निवेदनांपैकी **१२** निवेदने गुरुवार, दिनांक २० ऑक्टोबर, २०२६ रोजीच्या पत्रक भाग-दोन क्रमांक १३० अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. आता २७ निवेदनांपैकी २४ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत. उर्वरित प्रलंबित ३ निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीव्दारे सन्मा. विधानसभा सदस्यांनी संपूर्णत: ऑनलाईन (online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे सन्मा. विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (online) पध्दतीने उत्तर प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग-२ व्दारे अवगत करण्यात येईल.

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०२६

मेघना तळेकर
सचिव-२,
महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत :-**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
७) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये

१०) संगणक कक्ष (WEBSITE)

११) एम. के. सी. एल.

१२) अनुवाद कक्ष

१३) प्रतिवेदन कक्ष

(५)

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे तिसरे (हिवाळी अधिवेशन)

## लक्षवेधी सूचना क्र.१८५९

मा. श्री. चरणसिंग ठाकूर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"धर्मादाय आयुक्तालयात अधीक्षक पदावर कार्यरत असणारे हे सहाय्यक धर्मादाय आयुक्त या पदावर पदोन्नतीस पात्र असणे, सहाय्यक धर्मादाय आयुक्त पदावरील पदोन्नती अधीक्षक संवर्गातून विभागीय परिषदद्वारे करणे,धर्मादाय संघटनेतील सहाय्यक धर्मादाय आयुक्त गट या पदावरील पदोन्नतीकरिता विभागीय परीक्षा नियमाच्या प्रारूपात सदरील परीक्षा एकूण तीन संधीमध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक राहील असे प्रावधान केले असणे तथापि सदरील प्रावधानास विधी व न्याय विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाने विरोध केला असणे, सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय संबंधित शासकीय अधिकारी कर्मचारी हे वरिष्ठ पदासाठी पात्र ठरत नसणे, धर्मादाय संघटनेतील सहाय्यक धर्मादाय आयुक्त गट या पदावरील पदोन्नतीकरिता विभागीय परीक्षा नियमाच्या प्रारूपात विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून कोणत्याही व्यक्ती सूट मिळणार नाही असे प्रावधान करण्यात येणे, कर्मचाऱ्यांनी सध्याच्या पदावर किमान १५ वर्षे सेवा पूर्ण केल्याचा दिनांक किंवा त्याच्या वयाची ५० वर्ष पूर्ण झालेला दिनांक यापैकी जे नंतर घडेल त्यानंतरच्या लगेच त्यासदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट आणूनही करणे उचित राहील असा अभिप्राय विधी व न्याय विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाने देणे, शासनाचे विभागीय परिषदेचे धोरण विधी व न्याय तसेच सामान्य प्रशासन विभागाने पूर्णपणे दुर्लक्ष करणे, धर्मादाय संघटनेत असे एकूण चार पात्र अधीक्षक असून ज्यांनी वयाची ५० वर्षे पूर्ण केली आहे तसेच त्यांचे वय व अनुभव यांचा कुठलाही विचार धर्मादाय संघटनेतील साहेब धर्मादाय आयुक्त गट या पदावरील पदोन्नती करिता विभागीय परीक्षा नियमात केला नसणे, धर्मादाय संघटनेच्या सहाय्यक धर्मादाय आयुक्त गट ब पदावर पदोन्नती करिता विभागीय परीक्षांचे नियम विधी व न्याय विभाग, सामान्य प्रशासन विभागाने नमूद केल्याप्रमाणे दुरुस्त करण्यात यावेत विभागीय परीक्षांच्या नियमातून जास्तीत जास्त तीन संधीची अट रद्द करावी, वयाची ५० वर्ष पूर्ण झालेल्या अधीक्षकांना विभागीय परिषदेतून सूट द्यावी, विभागीय परीक्षेची प्रश्नपत्रिका तयार करणे व तपासणीसाठी विद्यापीठावरील अनुभवी प्राध्यापकांची नियुक्ती करावी, धर्मादाय संघटनेतील सहाय्यक धर्मादाय आयुक्त पदावरील एकूण मंजूर ८२ पदांपैकी पदोन्नतीच्या कोट्यातील सर्वच पदे रिक्त असल्याने पदोन्नतीची प्रक्रिया गतिमान पारदर्शक कालबद्ध विभागीय परीक्षांनी पदोन्नतीच्या सामायिक धोरणात संगत होईल या दृष्टीने करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ५च्या उपकलम (२अ) च्या खंड (क) मध्ये धर्मादाय संघटनेच्या आस्थापनेवरील सहायक धर्मादाय आयुक्त, गट-अ या पदावर पदोन्नतीद्वारे नियुक्तीसाठी अर्हतेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे तरतूद आहे:-

*"जी, कायद्याद्वारे स्थापन केलेल्या कोणत्याही विद्यापीठाची किंवा याबाबतीत राज्य शासनाने मान्यता दिलेल्या अन्य कोणत्याही विद्यापीठाची कायद्याची पदवी धारण करीत असेल आणि जिने, अशी पदवी प्राप्त केल्यानंतर, धर्मादाय संघटनेतील अधीक्षक किंवा विधि सहायक पदावर पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी काम केले असेल आणि राज्य शासनाने विहित केलेल्या नियमांनुसार घ्यावयाची पदोन्नती विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली असेल, अशी व्यक्ती."*

उपरोक्त तरतुदीन्वये राज्य शासनास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन शासनाने दि.१७.०१.२०२५ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये "धर्मादाय संघटनेतील सहायक धर्मादाय आयुक्त, गट-अ या पदावरील पदोन्नतीकरिता विभागीय परीक्षा नियम, २०२५" हे नियम अधिसूचित केले आहेत. सदर नियमांनुसार, विधि पदवी प्राप्त केल्यानंतर धर्मादाय संघटनेत अधीक्षक किंवा विधि सहायक या पदावर पाच वर्षे नियमित व सलग सेवा केलेली व्यक्ती सहायक धर्मादाय आयुक्त पदावर पदोन्नतीसाठीच्या विभागीय परिक्षेस बसण्यास पात्र आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.३१.०३.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये ठरविण्यात आलेल्या राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांच्या विभागीय परिक्षांसंदर्भात सामायिक बाबींच्या धोरणानुसार, पदोन्नतीसाठीच्या विभागीय परिक्षेसाठी संधींची मर्यादा निश्चित करण्यात येत नाही. तथापि, संधींच्या विहित संख्येअभावी पदोन्नतीसाठी पात्र उत्तीर्ण कर्मचा-यांच्या सेवाज्येष्ठतेचा प्रश्न उद्भवू शकतो, ही बाब विचारात घेता, सदर नियमांमध्ये, कर्मचा-यास त्याची सेवाज्येष्ठता अबाध्य ठेवण्यासाठी सलग तीन संधींमध्ये परीक्षा उत्तीर्ण होण्याची तरतूद करण्यात आली आहे. तथापि, असा कर्मचारी विहित तीन संधींत विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास, त्याची सहायक धर्मादाय आयुक्त पदावरील पदोन्नतीची संधी कायमची हुकली जाईल, ही बाब वस्तुस्थितीस धरुन नाही. सहायक धर्मादाय आयुक्त या पदावर पदोन्नती देण्यासाठी विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असल्याने, संबंधित कर्मचारी सदर परिक्षेस बसण्यासाठी कितीही संधी उपभोगू शकेल, अशी तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतूद मंत्रालयीन विभागात घेण्यात येणा-या विभागीय परीक्षांशी सुसंगत असून, सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेनेच सदर तरतूद करण्यात आली आहे.

सहायक धर्मादाय आयुक्त या पदावर पदोन्नती देण्यापूर्वी, सदर पदावर काम करण्यासाठीची कर्मचा-याची क्षमता तपासण्यासाठी सदर परीक्षा आयोजित करण्यात येते. सामान्य प्रशासन विभागाच्या धोरणानुसार कर्मचा-याची शासन सेवेत १५ वर्षे सेवा पूर्ण झाल्याच्या दिनांकास किंवा त्याच्या वयाची ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या दिनांकास, यापैकी जे नंतर घडेल त्यानंतर लगतच्या

दिनांकास पदोन्नतीसाठीची विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येते. तथापि, सहायक धर्मादाय आयुक्त, गट-अ या पदाचे अर्धन्यायिक कामकाजाचे स्वरुप, कर्तव्ये व विविधांगी जबाबदा-या तसेच अधिका-यांकडे क्षमता नसल्यामुळे प्रलंबित राहणारी न्यायिक प्रकरणे व त्यांचा सामान्य जनता व सामाजिक संस्थांच्या कारभारावर होणारा थेट परिणाम विचारात घेता, सदर पदावर पदोन्नतीकरिता अधीक्षक व विधि सहायक, गट-ब (अराजपत्रित) या निम्नसंवर्गांतील कर्मांचा-यांनी विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य करण्यात आले असून, त्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट अनुज्ञेय करण्यात आलेली नाही. सदर तरतूद सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीनेच करण्यात आलेली आहे.

पदोन्नतीसाठीची विभागीय परीक्षा ही संबंधित विभागाची आंतरिक बाब असून, सदर परिक्षेचे आयोजन विभाग स्तरावर करण्यात येते. त्यामुळे, सदर परिक्षेची प्रश्नपत्रिका तयार करणे किंवा उत्तरपत्रिका तपासणे या बाबींकरिता बाहेरुन विद्यापीठांच्या प्राध्यापकांची नियुक्ती करण्याची मागणी प्रशासकीयदृष्ट्या व्यवहार्य व संयुक्तिक नाही.

सहायक धर्मादाय आयुक्त, गट-अ या संवर्गाच्या पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याबाबत शासन कटिबद्ध असून, सदर पद हे अर्धन्यायिक जबाबदा-या असणारे अत्यंत जबाबदारीचे गट-अ दर्जाचे पद असल्याने, सदर पदावर नियुक्त होणारी व्यक्ती सुयोग्य क्षमता व गुणवत्तेची असावी हे अभिप्रेत आहे. सदर क्षमता तपासण्यासाठीच महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये पदोन्नतीसाठी विभागीय परिक्षेची तरतूद करण्यात आली असून, सदर परिक्षेच्या नियमांतील तरतुदी कायद्याच्या हेतूस अनुरुप असून, सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने करण्यात आल्या असून, त्यात कोणतीही अनियमितता नाही.

*******

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

श्री. विश्वनाथ भोईर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५६५ पुढीलप्रमाणे आहे:-

"ठाणे जिल्ह्यातील कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक रस्त्यावर मोठ्या प्रमाणात देहव्यापार करणा-या महिलांचा होत असलेला वावर, त्यामुळे महिला प्रवाशांना मानसिक त्रास सहन करावा लागत असून त्यांच्यात निर्माण झालेले भीतीचे वातावरण, तसेच सदर परिसरात महिला, विद्यार्थीनी व तरुणींच्या असुरक्षिततेचा निर्माण झालेल प्रश्न, कल्याण परिसरातील हॉटेल, लॉजिंग इतर ठिकाणी सदर देहव्यापारी महिला अवैधरित्या देहव्यापार करीत असणे, त्याकडे संबंधित विभागाचे होते असलेले दुर्लक्ष, सदर देहव्यापारी महिलांमुळे शहराची होत असलेली बदनामी, परिणामी स्थानिक नागरीकांमध्ये वाढता तीव्र असंतोष, कल्याण पश्चिम रेल्वे स्टेशन परिसरात सुरु असलेल्या अवैध देहव्यापाराला आळा घालण्याच्या अनुषंगाने तातडीने चौकशी करुन अवैधरित्या देवव्यापार करणाऱ्या महिलांवर व हॉटल, लॉज मालकांवर तसेच त्यांना पाठिशी घालणा-या पोलीसांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

मा.मुख्यमंत्री महोदय यांचे निवेदन

कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक परिसरात देहव्यापार करणाऱ्या महिलांचा शोध घेऊन सन २०२५ मध्ये ३ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये एकूण ३२ पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. सदर परिसरात दररोज साध्या वेशातील तसेच गणवेशातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकडून पायी गस्त करण्यात येते. तसेच, अश्लील हावभाव करणाऱ्या महिला आढळून आल्यास त्यांचेविरूध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११०/११७ अन्वये कारवाई करण्यात येते. पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर हद्दीत २०२४ मध्ये १७३ व नोव्हेंबर, २०२५ अखेर पर्यंत एकूण ५९४ प्रकरणी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११०/११७ प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

राज्यातील अनैतिक मानवी वाहतुकीला आळा घालण्यासाठी राज्यात ४५ अनैतिक मानवी वाहतूक कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे अनैतिक मानवी वाहतूक कक्षाचे राज्यस्तरीय नोडल अधिकारी आहेत.

राज्यात १८ वर्षाखालील हरविलेल्या बालकांच्या बाबतीत माहिती प्राप्त झाल्यावर त्याची त्वरीत दखल घेऊन त्यांच्या कायदेशीर पालकांकडून किंवा नातेवाईकांकडून तक्रार घेऊन अपहरणाचा गुन्हा (एफ.आय.आर.) दाखल करणेबाबत तसेच अशा गुन्ह्यांमध्ये हरविलेल्या मुलांची माहिती www.trackthemissingchild.gov.in या संकेतस्थळावर भरण्याबाबत शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच अशा गुन्हयांमधील बालक दोन महिन्यापेक्षा अधिक कालावधीत मिळुन न आल्यास या तक्रारी संबंधित अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडे पुढील तपासकामी वर्ग करण्यात येतात.

हरवलेल्या महिला व बालकांचा शोध घेण्यासाठी प्रत्येक पोलीस उप विभागात मिसिंग सेल स्थापन करण्याबाबत तसेच बेपत्ता महिला/बालकांचे प्रकरणी अनुसरावयाची आदर्श कार्यपद्धती (SOP) याबाबत अपर पोलीस महासंचालक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दिनांक १५.०४.२०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

अनैतिक मानवी वाहतुकीला आळा घालणे, अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करणे तसेच "अनैतिक मानवी वाहतुक" या विषयावर कायदेशीर मार्गदर्शन होणे याकरीता अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षात कार्यरत अधिकारी / अंमलदार यांच्याकरीता वेळोवेळी प्रशिक्षण आयोजित करण्यात येते.

महिला व मुलींसंबंधीत येणारे सर्व प्रकारचे गुन्हे नोंदविणे, त्यांचा तपास करून निर्गती करणे, महिलांच्या संबंधीत येणारे सर्व अर्ज चौकशी करणे व या अनुषंगाने आवश्यक त्या ठिकाणी प्रतिबंधक कार्यवाही करणे, समस्याग्रस्त महिलांचे समुपदेशन करणे या प्रकारच्या महिलांसंबंधीत समस्यांवर संवेदनशीलपणे व तात्काळ कार्यवाही करण्याकरीता सर्व पोलीस स्टेशन मध्ये महिला सहाय्य कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत.

---

लक्षवेधी सूचना क्रमांक १७५७

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन**

**मा.श्री.विजय वडेट्टीवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १७५७ पुढीलप्रमाणे आहे :-**

"चंद्रपूर जिल्ह्यातील व नागपूर विभागात मोठ्या प्रमाणात कोल वासरी मध्ये होत असलेले भ्रष्टाचार माहे डिसेंबर २०२५ मध्ये समोर येणे, यामध्ये प्रामुख्याने सन २०२१ पासून महाजनकोचे एम एस एम एस सी यांनी कॉल वासरीचा काम चार कंपन्यांना देत असणे, सदर बाबी बाबी तीन कंपन्यांना देण्यात येणाऱ्या कोळसा पुरवठा अत्यंत निकृष्ट दर्जाचा होत असणे त्यामध्ये प्रामुख्याने हिंद एसीबी आर आय पी एल यांच्या समावेश असणे, सन २१-२५ या चार वर्षांमध्ये सदर कंपन्यांवरती साडेसातशे कोटी रुपयांची दंड देऊन रिकवरी कॉल होणे, एम एस एम सी याची नोडल एजन्सी नोंदणी असणे, सदर कंपनीकडून दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी महाजनकोने आपल्या नोडल एजन्सीला वारंवार पत्र व्यवहार करणे परंतु नोडल एजन्सी यांनी निविदास सूचना देत असताना ज्या बँक गॅरंटी ची आवश्यकता असते ते बँक गॅरंटी न घेत असणे व त्यांच्याकडून दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी कोणतीही कारवाई अद्याप पर्यंत न करत असल्यामुळे शासनाच्या होत असलेला कोट्यावधीच्या नुकसान यावर शासनाने करावयाची कारवाई उपाययोजना."

**मा.मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन**

महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ (MSMC), हा महाराष्ट्र सरकारचा अंगीकृत उपक्रम असल्यामुळे आवश्यक त्या मात्रा व गुणवत्तेचा धुतलेला कोळसा पुरविण्यासाठी महानिर्मिती कंपनीमार्फत डब्लु.सी.एल. (WCL), एस.ई.सी.एल. (SECL) आणि एम.सी.एल. (MCL) यांच्या खाणीतील कच्चा कोळसा उचलून वॉशरीमधुन धुतलेला कोळसा महानिर्मितीच्या विविध औष्णिक वीज केंद्राना पुरविण्यासाठी मे. MSMC ला 'नोडल एजन्सी' नियुक्त करण्यात आले आहे. मे. MSMC ने विविध वॉशरी ऑपरेटरला खुल्या निविदेद्वारे विविध खाणी क्षेत्रातून कच्चा कोळसा वॉशरीमध्ये धुवून महानिर्मितीला पुरविण्यासाठी नियुक्त केले आहे. डिसेंबर-२०२५ मध्ये चंद्रपुर जिल्ह्यातील व नागपुर विभागातील महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ संचलित कोल वॉशरीमध्ये कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा पुरेसा स्पष्ट नाही. कराराप्रमाणे गुणवत्ता व इतर मानकासंबंधी निकषांचे पालन न केल्याबद्दल महानिर्मिती कंपनीमार्फत एम.एस.एम.सी.ला करारानुसार दंड लागू करते. या दंडात्मक कार्यवाही मध्ये कुठलीही अनियमितता आढळून आली नाही.

धुतलेल्या कोळशाची गुणवत्ता आणि प्रमाण योग्य राहण्यासाठी MSMC ने मॉनिटरिंग एजन्सीची नियुक्ती केली आहे. मॉनिटरिंग एजन्सीद्वारे सर्व प्रक्रियेवर निगराणी करून अहवाल सादर केला जातो. औष्णिक वीज केंद्रांना पुरविल्या जाणाऱ्या धुतलेल्या कोळशाची गुणवत्ता पॉवर फायनान्स कार्पोरेशन या केंद्रीय शासनाद्वारे संचलित संस्थेने नेमलेल्या तृतीय पक्ष एजन्सीद्वारे (Third Party Sampling Agency) तपासली जाते. सदर गुणवत्ता तपासणी ही महानिर्मिती कंपनीच्या औष्णिक वीज केंद्र, Central Coal & Oil Testing Laboratory (CCOTL) हे दोन विभाग व MSMC च्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत केली जाते.

धुतलेल्या कोळश्याच्या करारात गुणवत्तेचे मानक व निकष तसेच दंड आकारण्याची पद्धत सुस्पष्टपणे नमूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार धुतलेल्या कोळश्या संदर्भात नमूद केलेल्या प्रमाण आणि गुणवत्तेसाठी कोळश्याचे निकष पालन न केल्याबद्दल महानिर्मिती कंपनी ही MSMC ला करारानुसार दंड लागू करते. या दंडात्मक कार्यवाहीमध्ये अनियमितता आढळून आलेली नाही.

महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाला नागपूर व चंद्रपूर विभागात कार्यरत असलेल्या वॉशरीवर आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम सन-२०२१ पासून ते मार्च-२०२४ पर्यंत सुमारे रु.३००/- कोटी एवढी आहे. तसेच, एप्रिल-२०२४ ते आजपर्यंत आकारलेल्या दंडाची रक्कम निर्धारित करण्याची प्रक्रिया सुरू असून, गुणवत्तेसंबंधी पंच संस्थेचे (रेफ्री एजन्सी) चे निष्कर्ष प्राप्त झाल्यावर निर्धारित करण्यात येतील.

महानिर्मिती कंपनी आणि महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ (MSMC) यांच्यातील मूळ कराराप्रमाणे बँक गॅरंटीची पूर्तता झालेली आहे. तसेच सुधारित करारानुसार (Amendment Contract) आवश्यक असलेली बँक गॅरंटी पुरविण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या प्रकरणी कराराप्रमाणे दंडाची रक्कम ही नियमितप्रमाणे आकारण्यात येते. सदरहू कंत्राटातील पुरवठा केलेल्या कोळश्याची गुणवत्ता व इतर बाबी लक्षात घेऊन एम.एस.एम.सी. (MSMC) ला धुलाईसाठी देण्यात येणाऱ्या कोळश्यामध्ये बरीच कपात केलेली आहे. तसेच कोराडी औष्णिक वीज केंद्रास पुरवण्यासाठी सुयोग्य पर्यायी कोळश्याची व्यवस्था टप्प्याटप्प्याने लागू करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**********

# महाराष्ट्र विधानसभा

**नगर विकास विभाग** **लक्षवेधी सूचना क्रमांक १७०१**

## सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

**श्री.राघवेंद्र पाटील,वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघातील व महानगर पालिका हद्दीतील ११ गावांच्या अतिक्रमित गावठाण जागेवर मागील २५ ते ३० वर्षांपासून अनेक कुटुंब एकाच जागेवर कायम वास्तव्यास येणे, सदर जागेवर वास्तव्य करत असतांना त्यांच्याकडून नगरपालिकेची घरपट्टी व पाणीपट्टी शासन नियमानुसार नियमित वसूल केली जाणे, स्वत:च्या मालकीची जागा नसल्याने त्यांना बँकेकडून कर्ज मिळत नसणे व इतरही शासकीय लाभापासून त्यांना वंचित रहावे लागणे, धुळे विधानसभा मतदार संघातील व म.न.पा. हद्दीतील अतिक्रमित गावठाण जागेवर राहणाऱ्या रहिवाश्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना हक्काचा ७/१२ मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन**

धुळे महानगरपालिका "ड" वर्ग महानगरपालिका असून तिची स्थापना दिनांक ३० जून २००३ रोजी झाली आहे. धुळे शहराचे त्यावेळेस क्षेत्रफळ ४६.४६ चौरस किलोमीटर होते तसेच लोकसंख्या सुमारे ३.५० लक्ष एवढी होती. दिनांक ५ जानेवारी २०१८ रोजी धुळे महानगरपालिकेची हद्दवाढ झाली असून यात एकूण ११ गावांचा समावेश करण्यात आला आहे.

दिनांक ५ जानेवारी २०१८ रोजी धुळे महानगरपालिकेची हद्द वाढ झाल्यानंतर लगतच्या ११ गावांचा समावेश महानगरपालिका क्षेत्रात करण्यात आला आहे. यानुसार सुमारे ५४.६२ चौ. किमी क्षेत्रफळात वाढ होऊन अंदाजे ३२ हजार मालमत्तांचा सामावेश महानगरपालिका क्षेत्रात झाला आहे. सदर ११ गावांच्या समावेशनानंतर धुळे महानगरपालिका क्षेत्रामध्ये ५४.६२ चौ.किमी एवढी वाढ होऊन एकूण १०१.०८ चौ.किमी क्षेत्रफळ झालेले असून अंदाजित ५ लक्ष एवढी लोकसंख्या झालेली आहे.या मालमत्तांना महानगरपालिकेमार्फत मालमत्ता कर व पाणी पट्टी आकारण्यात येते.

या ११ गावांमध्ये बहुतांशी मालमत्ताधारकांकडे मालकी हक्काचे दस्तऐवज उपलब्ध नाहीत. यातील बहुतांश घरे ही गावठाण/शासकीय जागेवर आहेत. ग्रामपंचायत अस्तित्वात असतांना या जागाधारकांना भोगवटादार म्हणून नमूना ८ अ प्रमाणपत्र ग्रामपंचायतीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिले जात होते. यातील बहुतांशी घरे ही सुमारे २५ हून अधिक वर्षांपासून अस्तित्वात आहेत. सद्यस्थितीत या भागात एकही घोषित झोपडपट्टी अस्तित्वात नाही.

धुळे महानगरपालिकेच्या तत्कालीन सदस्यांच्या मागणी नुसार हद्दवाढ भागांतील गावठाण हद्दीत ११ गावांना सिटी सर्व्हे लागू करण्याबाबतचा विषय महासभेसमोर ठेवून दि.२५.०७.२०२३ रोजी धुळे महानगरपालिका ठराव क्र. २६३ पारित करण्यात आला. त्यानुसार जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख विभाग, धुळे व नगरभूमापन अधिकारी, धुळे यांच्याकडे हद्दवाढ गावांना सिटी सर्व्हे लागू करण्याबाबत मनपाने जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख विभाग कार्यालयाला दिनांक ११/१०/२०२३ रोजी व वारंवार लेखी कळविले आहे. याबाबत मनपा कडुन पाठपुरावा करण्यात येत आहे.

तत्का. मनपा सदस्य यांनी केलेल्या मागणीनुसार हद्दवाढ भागांतील गावांना ७/१२ उतारा लागू करणे बाबतचा विषय जिल्हाधिकारी कार्यालय धुळे, जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख विभाग धुळे व नगरभूमापन अधिकारी , धुळे यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे. त्याबाबतही मनपा कडुन पाठपुरावा करण्यात येत आहे.

अर्बन स्वामित्व योजने अंतर्गत सर्वे ऑफ इंडिया कडून drone survey पूर्ण झाल्यानंतर सिटी सर्वे लागू करण्याची कार्यवाही करण्यात येईल अशी जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख यांच्या कार्यालयाची धारणा आहे.

सर्वांसाठी घरे – २०२२ (प्रधान मंत्री आवास योजना) या योजनेतून सर्व शासकीय विभागांच्या जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबत नगर विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ०६ मार्च २०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. या धोरणानुसार ०१/०१/२०११ किंवा त्यापूर्वी निवासी प्रयोजनासाठी अतिक्रमण केलेले भूखंड नियमानुकूल करण्यास पात्र आहेत. असे अतिक्रमण भोगवटादार वर्ग २ या धारणाधिकारावर १५०० चौरस फुटाच्या मर्यादेत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेने नियमानुकूल करण्यात येतात.

यानुसार प्रथम टप्प्यात पात्र लाभार्थी यांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात येतात. यानंतर या जमिनीचा अभिन्यास तयार करून मंजूर केला जातो. ही अतिक्रमणे नियमानुकूल करतांना सनदेमध्ये पती व पत्नी दोघांची नावे सामाविष्ट करण्यात येतात.

दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ पासून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रात PMAY २.० योजना लागू केली आहे. यानुसार मुळ PMAY योजनेत "झोपडपट्ट्याचे आहे तेथे पुनर्वसन" (In situ slum rehabilitation) या घटकाचा सामावेश होता तो नवीन योजनेत नाही.

तसेच या योजनेतून झोपडपट्ट्यांचे आहे तेथे नियमितीकरण प्रक्रियेत जागेची मोजणी करताना नगर भूमापन कार्यालयाकडून मोजणी शुल्क आकारले जाते सदर मोजणी शुल्कची रक्कम अधिक असल्याने महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता, सदर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत महानगरपालिका स्तरावर तजवीज करण्यात येत आहे.

**********

लक्षवेधी सूचना क्र. १८३४

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन**

**मा.श्रीम. स्नेहा दुबे, विधानसभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.१८३४ पुढीलप्रमाणे आहे :-**

""वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात ८००० गृहनिर्माण संस्था, शेकडो चाळी घरे आणि ५२ महसूली गावात हजारो घरे, आदिवासी पाडे असणे, महानगरपालिकेने सीसी दिलेल्या हजारो इमारतींपैकी जवळपास ९०% इमारतींना ओसी दिलेली नसणे, त्याचप्रमाणे वसईच्या मूळ गावातील तसेच गावठणातील घरांना, आदिवासी पाडयातील ५० वर्ष जुन्या घरांबाबत सी.सी./ओ.सी.चा प्रश्न निर्माण होत नसणे, मागील ३० ३५ वर्षान आता वसई विरारसाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असणे, मा. सर्वोच्य न्यायालयाने दिनांक १७/१२/२०२४ रोजी दिलेल्या आदेशांचा चुकीचा अन्वयार्थ लावून वसई विरार महानगरपालिका क्षेत्रात सरसकट नळ जोडणी नाकारणे, या मुद्यावर दिनांक १६/०७/२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत चर्चा होऊन "सीसीच्या आधारे पाणी देण्यात यावे" असे निर्देश मा. मुख्यमंत्री यांनी दिले असणे, मात्र ५ महिन्याच्या कालावधीनंतरही महानगरपालिकेकडून या आदेशांची अंमलबजावणी न होणे, दिनांक १७/१२/२०२४ पूर्वीच्या इमारतींना घरांना नळ जोडणी देण्यास कोणतीच बाधा नसल्याची धारणा पक्की करण्याची विनंती महानगरपालिकेने नगर विकास विभागाकडे केलेली असणे, मात्र मागील ६ महिन्यात यावर नगरविकास विभागाकडून कोणतेच उत्तर दिले जात नसणे, दिनांक १६/०७/२०२५ रोजीच्या बैठकीतील आदेशांचीही महानगरपालिकेकडून अंमलबजावणी न करणे, परिणामी पुरेसे पाणी उपलब्ध असूनही वसई विरारकरांना पाण्यापासून वंचित राहावे लागत असल्याने नागारिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.""

**मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन**

वसई-विरार उप प्रदेशातील भूतपुर्व ४ नगरपरिषदा व परिसरातील ५३ गावांचा समावेश करून दि.०९/०७/२००९ रोजी वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली आहे. महानगरपालिकेचे क्षेत्रफळ ३११ चौ.कि.मी. इतके विस्तारीत असून डोंगरी, नागरी व सागरी भागात विस्थापिलेले आहे. महापालिका क्षेत्राची सन २०११ च्या जनगणनेनुसार १२.२३ लक्ष व सद्याती लोकसंख्या आधिक आहे. सद्याची पाण्याची मागणी ४२२ द.ल.ली. प्रतिदिन इतकी आहे. वसई-विरार शहर महानगरपालिकेस सद्यःस्थितीत पेल्हार, उसगांव, सुर्या टप्पा-१, सुर्या टप्पा-३ व MMRDA या योजना मधुन सुमारे ४०० दशलक्ष प्रतिदिन पाणी उपलब्ध होत आहे. सद्यःस्थितीत अस्तित्वातील जलवाहिन्यांच्या क्षमतेनुसार ३७० द.ल.ली. पाणी नागरीकांना वितरीत करण्यात येत आहे.सद्यःस्थितीत महानगरपालिकेमार्फत ६७९५६ इतक्या नळजोडण्या दिल्या आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल याचिका Civil Appeal No.१४६०४/२०२४ वर दि.१७/१२/२०२४ रोजी निर्णय दिला असून मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाची अंमलबजावणी राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये करण्याबाबत दि.२५/०४/२०२५च्या परिपत्रकाव्दारे

शासनाने कळविले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील २१.४ मध्ये पुर्णत्वाचा/ भोगवटा प्रमाणपत्र सादर केल्यानंतर सदर इमारतींना आवश्यक इलेक्ट्रीक सिटी, पाणी पुरवठा इत्यादी सुविधा पुरवण्याबाबत नमुद आहे.

महापालिका स्थापनेपूर्वी (सन २००९ पुर्वी) पासून नगरपरिषदा अथवा ग्राम पंचायत काळापासून बऱ्याच मालमत्ता ह्या क्षेत्रात अस्तित्वात आहेत व त्यांना मालमत्ता कर आकारणी सह मुलभूत सेवा-सुविधा महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येत आहेत. महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट ५२ गावे हि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ६९ गावांच्या पाणी पुरवठा योजनेतील आहेत. सदर योजनेतील जलवाहिन्या नादुरूस्त असल्याने व सदरची ६९ गावांची पाणीपुरवठा योजना महापालिकेकडे हस्तांतरीत न झालेने सन २०११ पासून ते सन २०२४ पर्यंत सदर भागातील नळजोडण्या महापालिकेमार्फत मंजूर करता आल्या नाहीत.

ग्रा.प. / न.प. काळापासून अस्तित्वात असलेल्या मालमत्तांना भोगवटा प्रमाणपत्र नाही असे पाणी मागणी अर्ज महापालिकेस प्राप्त होत आहेत. सद्यः स्थितीत उपलब्ध असलेल्या पाण्याच्या प्रमाणात प्राप्त होणाऱ्या पाणी मागणी अर्जानुसार सर्व नळजोडण्या मंजूर करून नागरिकांना पाण्याचा लाभ उपलब्ध करून देणे महानगरपालिकेस शक्य आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विविध प्रभाग समिती अंतर्गत (ग्रामपंचायत / नगरपरिषदा काळापासून) अस्तित्वातील जुन्या मालमत्ता धारकांमार्फत नविन नळजोडण्या मंजूरीकामी अर्ज महापालिकेस प्राप्त होत आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या दिनांकापुर्वी अस्तित्वातील मालमत्तांना "ज्या मालमत्तांना कर आकारणी झाली आहे व ग्राम पंचायत काळापासून मालमत्तांचा वापर सुरू आहे" अशा नळ जोडण्या मंजूर कराव्यात अशी वसई-विरार शहर महानगरपालिकेची धारणा असून सदरची धारणा पक्की करण्यासाठी मार्गदर्शनपर पत्रव्यवहार शासनास दि.०२/०५/२०२५, दि.१७/०६/२०२५ व दि.११/०८/२०२५ रोजी केला आहे. दि. ०२/०५/२०२५ च्या पत्रास अनुसरून शासनाने सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल याचिकेत मा. न्यायालयाने दिलेला निर्णय स्वयंस्पष्ट असल्याचे व सदर निर्णयाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेऊन नियमोचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

दि. १६/०७/२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार महापालिकेने उचित कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. त्यानूसार महानगरपालिकेने कोणावरही पाण्यावाचून वंचित राहु नये, यासाठी अडीअडचणी दुर करुन नागरिकांना नळजोडणी सुसह्य करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या पाणी अर्जाची व सोबत जोडलेल्या कागदपत्रांची पडताळणी करून शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्देशानुसार उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

***

(e8)

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन**

**लक्षवेधी सूचना क्र.१८४७**

**श्री. दिलीप लांडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८४७ पुढीलप्रमाणे आहे:-**

"मुंबई उपनगरी जिल्ह्यातील मोहिली व्हिलेज व असल्फा व्हिलेज, साकीनाका हा संपूर्ण परिसर डोंगराळ, झोपडपट्टी प्रधान व नागरी सुविधांपासून वंचित असल्याने नागरिकांचे सामाजिक-आर्थिक जीवन आजही अत्यंत दयनीय स्थितीत असणे, मुंबई विकास आराखडा २०३४ मध्ये सदर परिसरास हरित पट्टा दर्शविल्यामुळे एस.आर.ए., महानगरपालिका किंवा खाजगी विकासकांद्वारे झोपडपट्टी पुनर्विकास करणे पूर्णतः अशक्य होणे, परिणामी हजारो झोपडीधारक गेल्या अनेक वर्षांपासून पुनर्वसन, मूलभूत सुविधा व सुरक्षित वास्तूंच्या प्रतीक्षेत अडकून राहणे, झोपडपट्ट्यांचे डोंगराळ भूस्खलन प्रवण स्वरूप लक्षात घेता आपत्तीचा धोका गंभीरपणे वाढत जाणे, सदर हरित पट्टा कायम ठेवल्याने परिसराच्या विकासावर संपूर्ण बंदी येणे, नागरिकांच्या जीवनमानावर परिणाम होणे व शासनाच्या सर्वसमावेशक विकास धोरणालाही बाधा पोहोचणे, त्यामुळे सदर परिसरातील हरित पट्टा तात्काळ रद्द करून निवासी झोन आरक्षण करण्याची मागणी सातत्याने होत असून, जनजीवनाच्या सुरक्षेकरिता शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना."

**मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदय यांचे निवेदन**

मुंबई उपनगर जिल्ह्यातील मोहिली गाव, असल्फा गाव व साकीनाका परिसर बहुतांशी डोंगराळ व डोंगर उताराचा असून सदर परिसर मोठ्या प्रमाणात दाट झोपडपट्टीने व्याप्त आहे. सदरच्या झोपडपट्टीमध्ये मूलभूत सोयीसुविधा जसे की, पाणी पुरवठा, स्वच्छता, आरोग्य केंद्रे, रस्ते, पायवाटा, सार्वजनिक शौचालये इत्यादी सुविधा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पुरविल्या जातात. त्याच बरोबर पायवाटा सुधारणा, शौचालय दुरुस्ती, संरक्षण भिंत बांधणे यासारखी कामे मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (म्हाडा) यांच्यामार्फत केली जातात.

मुंबई उपनगर जिल्हयातील मोहिली व्हिलेज व असल्फा व्हिलेज, साकीनाका लगतचा बहुतांश भूभाग हा विकास योजना-२०३४ नुसार, 'उद्यान/बगीचा व खेळाचे मैदान' अशा खुल्या जागेच्या सार्वजनिक प्रयोजनार्थ आरक्षित असल्यांने सदर जागा विकास योजना नकाशात हिरव्या रंगाने दर्शविली आहे. सदर भाग हा हरित पट्टयाने बाधित होत नसून, रहिवासी क्षेत्रामध्ये (R Zone) स्थित आहे. सद्यस्थितीत सदर प्रभागातील बहुतांश आरक्षित भूभाग बांधकामे, झोपडपट्टी /व्यावसायीक गाळे यांनी भारग्रस्त आहे. आरक्षित जमिनींचे विकसनासंबंधी बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली-२०३४ मध्ये तरतुदी असून त्यानुसार सदर आरक्षित जमिनींचे विकसन होणे अभिप्रेत आहे.

**********

(८८)

लक्षवेधी सूचना क्रमांक-३३४

सन २०२५ चे (हिवाळी) अधिवेशन

श्री. निलेश राणे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्याच्या वाळू रेती निर्गती धोरणास दि. ८/४/२०२५ रोजीच्या मंत्रीमंडळाची मान्यता, त्यानुषंगाने वाळू /रेती निर्गती धोरण-२०२५ चा शा.निर्णयअसतांनाही वाळू उपलब्धतेमध्ये अडचणी, सिधुदुर्ग जिल्हयात मोठया प्रमाणात प्रधानमंत्रीआवास योजना टप्पा -२ व रमाई आवास या योजनेतंर्गत लाभार्थ्यांना घरकुले मंजूर,शहरात/ग्रामीण भागात अनेकांची बांधकामे सुरुअसून वाळूच्याअभावामुळे घरांचे बांधकाम अर्धवटस्थितीत व कांही कामे ठप्प्,ता.प्रशासनाकडून वाळूमाफियांवर कारवाया होत असल्या तरी त्याची झळ सर्वसामान्य बांधकाम करणा-या घरकुल लाभार्थ्यासह बांधकामव्यावसायिकांना बसणे,ग्रामीण व शहरी भागात वाळूचा मो.प्रमाणात तुटवडा निर्माण होणे,जादा दरांनी वाळूखरेदी करण्याची आलेली वेळ, ४ हजार र.प्रति ब्रासवरुन १२ ते १३ हजार रुपये ब्रासवर जाणे,जि. प्रशासनाने वाळूवितरण प्रक्रीया गतीमान करुन घरकुल लाभार्थ्यांना तातडीने वाळू उपलब्ध करुन देण्याची गरज,घाटांचे लिलाव वेळेत करण्याचे महसूल विभागाचे आदेश असतांनाही जाणीवपूर्वक दिरंगाई,अदयापी बहुतेक ठिकाणी वाळू चोरी,नुकतेच जालना तहसिलदारांना वाळुप्रकरणी गोळीबार झाल्याची घटना ताजीअसणे,वाळुअभावी घरकुलाची कामे लांबणी पडत असल्याने घरकुल बांधणीसाठी लाभार्थ्यांना मुदतवाढ मिळावी व शा.धोरणानुसार पाच ब्रास वाळू मोफत मिळावी अशी ग्रामस्थांकडून मागणी,तसेच सर्व घरकुल लाभार्थीना घरपोच वाळू रॉयल्टीची पावती पोहच करणे बंधनकारक असून सदर रॉयल्टी लाभार्थ्यांना ८ दिवसांत न मिळाल्यास जबाबदार तहसिलदार यांना जबाबदार धरण्यात येणारअसल्याचे मा.मंत्री महोदयांचे आश्वासन, शासनाच्या कांही धोरणांचा फटका गोरगरीबांना बसत असल्याने वाळूअभावी होणारी समस्या लक्षात घेऊन वाळू घाटांचे लिलाव व वाळू पुरवठा सुरळीत करण्याची गरज,याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

दिनांक ०८.०४.२०२५ च्या शासन निर्णयान्वये वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ निर्गमित केले असून, त्यामध्ये स्थानिक वापर व घरकुलासाठी सहज व सुलभतेने वाळू उपलब्ध करणे, पारंपारिक व्यवसाय करणा-या स्थानिक व्यक्तींना हातपाटी-डुबी पद्धतीने विनालिलाव पद्धतीचा वापर करुन वाळूगट उपलब्ध करुन देणे, खाजगी शेतजमिनीमध्ये नैसर्गिक कारणामुळे अथवा इतर कारणामुळे जमा झालेली वाळू निष्कासन करुन शेतजमीन लागवडीयोग्य करण्यासाठी वाळूचे निष्कासन करणे, पर्यावरण अनुमतीप्राप्त नदी/खाडी पात्रामधील वाळूगटाचे लिलाव करण्याची तरतूद केली आहे. नदी/खाडीपात्रामधून वाळू निर्गतीकरीता पात्र लिलावधारक यांना त्यांनी उत्खनन केलेल्या वाळूच्या १० टक्के वाळू प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील घरकूल लाभार्थ्यांला विनामूल्य उपलब्ध करुन देणे लिलावधारकास बंधनकारक केले आहे.

तसेच, दिनांक ३०.०४.२०२५ धोरणान्वये केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालय (भारत सरकार) यांचेकडील दि.२८ मार्च, २०२० च्या अधिसूचनेतील APPENDIX-IX मधील अनुक्रमांक ४ च्या तरतुदीनुसार निश्चित वाळूगट तसेच, पर्यावरण अनुमतीप्राप्त वाळू गटापैकी जे वाळू गट लिलावामध्ये गेलेले नाहीत अशा वाळूगटामधून तसेच इतर कोणत्याही कारणामुळे शासनाने जप्त केलेली वाळू स्वामित्वधन न आकारता कमाल ५ ब्रासपर्यंत शासनाच्या विविध घरकूल योजनांच्या अंतर्गत पात्र लाभार्थ्यांकरीता उपलब्ध करुन देण्याची तरतूद केली आहे. सदर धोरणामध्ये शासनाच्या विविध घरकूल योजनांच्या अंतर्गत पात्र लाभार्थ्यांची यादी गट विकास अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर तहसिलदार यांनी जवळचा वाळू गट नमूद करुन संबंधित ग्राम महसूल अधिकारी व ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी यांच्यामार्फत वाळू वाहतूक पासेस १५ दिवसांच्या आत घरकूल लाभार्थ्यांना घरपोच उपलब्ध करुन देण्याची तरतूद केली आहे. तहसिलदार यांनी घरकूल लाभार्थ्यांस पास उपलब्ध करुन दिल्याच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत वाळू उचल करण्याची जबाबदारी लाभार्थ्यांची असणार आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मंजूर घरकूले अंदाजे ३८११ असून त्यांनी १९,०५५ ब्रास वाळूची मागणी नोंदविली आहे. वाळू/रेती निर्गती धोरणानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यात खाडीपात्रामधील एकूण १८ उपगट निश्चित केले असून त्याच्या लिलावाची प्रक्रिया सुरू असून वाळू गटांचा लिलाव झाल्यास त्यामधून घरकूल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच, दिनांक ३०.०४.२०२५ च्या शासन निर्णयाद्वारे विहित धोरणानुसार स्थानिक वापरासाठी वाळू गट निश्चित करुन घरकूल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करुन देण्याबाबत तहसिलदारांना जिल्हाधिकारी यांनी दिल्या सूचना आहेत. तथापि, सिंधुदुर्ग जिल्ह्यात वाळू अभावी घरकूलाची कामे ठप्प असल्याबाबत व वाळूचे दर १२ ते १३ हजार ब्रास वर गेल्याची तक्रार प्राप्त झाली नसल्याचे जिल्हाधिकारी,सिंधुदुर्ग यांनी नमूद केले आहे.

दिनांक ११.०५.२०२५ रोजी पहाटे ५.०० वाजेच्या आसपास मौ. शहागड ता. अंबड, जि. जालना येथील गोदावरी नदीच्या पुलाजवळ वाळूचे अवैध उत्खनन व वाहतुक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने प्रतिबंधक कारवाईसाठी तहसिलदार अंबड आणि गौण खनिज प्रतिबंधक पथक कर्मचारी हे त्याठिकाणी गेले असता त्याना त्या ठिकाणी ३ ट्रॅक्टरने १५ ते २० लोक वाळूचे अवैधरीत्या उत्खनन करत असल्याचे आढळले. सदर ठिकाणी प्रतिबंधात्मक कारवाई करताना वाळू माफीयांनी हल्ला केल्याने तहसिलदार,अंबड यांनी स्वंरक्षणासाठी हवेत गोळीबार केला. त्यानुषंगाने संबंधितावर दिनांक ११.०५.२०२५ रोजी पोलीस स्टेशन, गोंडी येथे भारतीय न्याय संहिता,२०२३ च्या कलम ३०३,(२), १३२,२८३ व ३(५) अन्वये तसेच, खाण आणि खनिज (नियमन व विकास) अधिनियम, १९५७ च्या कलम ३ व ४ नुसार गु. र. क्र. ०१५८/२०२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयात तीन आरोपींना अटक करुन मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

दिनांक ०८.०४.२०२५ च्या धोरणानुसार राज्यात १०९५ वाळू गट निश्चित केले असून त्यापैकी ७५३ वाळू गटांस पर्यावरण अनुमती प्राप्त झाली आहे. त्यापैकी (१३८६८२५ ब्रास परिमाण) २२३ वाळू गटांचे लिलाव झाले आहेत. तसेच,दिनांक ०८.०४.२०२५ व दिनांक ३०.०४.२०२५ च्या वाळू धोरणानुसार दिनांक ३१.१०.२०२५ पर्यंत राज्यामध्ये एकूण १,९५,५९४ घरकूल लाभार्थ्यांना

५,०४,००२ ब्रास वाळू उपलब्ध करुन दिली आहे. राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना विशेषत: घरकूल लाआभार्थ्यांना बांधकामासाठी सहज वाळू उपलब्ध होण्यासाठी उप विभागनिहाय वाळू गट लिलावामध्ये न गेल्यास स्थानिक परिस्थितीनुसार तालुकानिहाय अथवा वाळू गटनिहाय लिलाव करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रधान करण्यात आले आहेत. याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांच्यासोबत वेळोवेळी बैठका आयोजित करुन वाळू गटांचे लिलाव व वाळू पुरवठा सुरळीत करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

**********

लक्षवेधी सूचना क्रमांक-८३१

सन २०२५ चे (हिवाळी) अधिवेशन

श्री. समाधान आवताडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मौजे वरुड़े, ता.शिरूर, जि.पुणे येथे आत्माराम जयवंत कलाटे, प्रकाश हुकुमचंद गांधी यांचे मालकीची व ताबेवहीवाटीची गट नं.४१९/४१६/२ ही मिळकत असणे,कलाटे व गांधी कुटूंबीय पुणे शहारामध्ये वास्तव्यास असल्याचा गैरफायदा घेणारे श्री बाळा धुमाळ,लक्ष्मण फंड व किरण काळे हे रात्रीअपरात्री सदर मिळकतीतून बेकायदेशीरपणे, चोरून मुरूम उत्खनन करून वाहतुक करीत असणे,सदर मिळकतीमध्ये बेकायदेशीरपणे उत्खनन होत असल्याची बाब जमिनीच्या मालकांस समजताच त्यांनी दि.०६.०४.२०२३ रोजी शिकापूर पोलिस स्टेशन येथे लेखी व ११२ या नंबर वर व स्टेशन डायरीला देखिल नोंदी केले असणे,त्यामुळे सदर तक्रारीच्या अनुषंगाने शिकापुर पोलीसांनी पंचनामा केले असणे, सदर जमिन मालकांनी पोलिसांस बेकायदेशीर उत्खननाचे व वाहतुक करतानाचे पुरावे दिले असणे, पोलिसांनी याबाबत पंचनामा केल्यानंतर पुढे कोणतीही कार्यवाही केली नसणे, मा.तहसिलदार,तलाठी व मंडळ अधिकारी यांच्याशी संगनमत करून उलट जमिनमालकांचे जमिनीवर बेकायदेशिरपणे केलेल्या उत्खननाचा क.गौ.ख./अना.दंड. उत्ख/एसआर/३९/२०२३, दिनांक ११.०६.२०२४ रोजीच्या आदेशाने बोजा चढविले असणे, याबाबत शासनाप्रती नागरिकांमध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे वातावरण यावर शासनाने तात्काळ चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांना बडतर्फ करून करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

---

श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

श्री.अत्माराम जयवंत कलाटे, प्रकाश हुकुमचंद गांधी, इत्यादी खातेदार यांच्या नांवे मौजे वरुडे, ता.शिरुर, जि.पुणे येथील जमीन गट नं.४१९/४१६/२ या गटामधून उत्खनन होत असल्याबाबत प्राप्त मौखिक तक्रारीच्या अनुषंगाने ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक व पोलीस पाटील, वरुडे यांनी दिनांक १८.०७.२०२३ रोजी पंचनामा करून तहसिलदार, शिरुर यांना सादर केला. सदर पंचनामा विचारात घेवून तहसिलदार, शिरूर यांनी संबंधित खातेदार यांना सुनावणीची संधी दिली, परंतु सुनावणीस संबंधित खातेदार उपस्थित राहिले नाही. त्यामुळे तहसिलदार, शिरुर यांनी दिनाक ०१.०६.२०२४ रोजी संबंधिताविरूध्द ११६० ब्रास अवैध मुरुम उत्खननाकरीता रक्कम रु.९१,८७,३०५/- इतक्या दंडात्मक रकमेचे आदेश पारित केले. सदर आदेशानुसार संबंधित

खातेदार यांच्या मौजे वरुडे, ता.शिरुर, जि.पुणे येथील जमीन ग. नं.४१९/४१६/२ मध्ये इतर अधिकारात बोजा दाखल करणेत आलेला आहे.

प्रकाश हुकुमचंद गांधी व इतर-१ यांनी तहसिलदार, शिरुर यांचे दिनांक ११.६.२०२४ रोजीचे आदेश उपविभागीय अधिकारी पुणे शहर-शिरुर, जिल्हा पुणे यांच्याकडे अव्हानित केले असून, त्यामध्ये नियमित सुनावणी घेण्यात येत असून प्रकरणी दिनांक १०.१२. २०२५ रोजी सुनावणी झाली असून प्रकरण निर्णयार्थ बंद केले आहे.

मौजे वरुडे, ता.शिरुर, जि.पुणे येथील जमीन गट नं.४१९/४१६/२ या मिळकतीमध्ये बेकायदेशीरपणे उत्खनन होत असल्याच्या तक्रारीची दि.०६.०४.२०२३ रोजी शिकापूर पोलिस स्टेशन डायरीला नोंद नाही. तसेच, मुरुम चोरीबाबत पोलीसांकडे तक्रार दाखल नसल्याने पोलीसांनी पंचनामा केलेला नाही. तसेच सदर जमीन मालकांनी मुरूम चोरीबाबत उपलब्ध अभिलेखानुसार पुरावे दिले नसल्याने व लेखी तक्रार दाखल नसल्याने कोणतीही कार्यवाही केलेली नाही, असे पोलीस निरीक्षक शिक्रापूर पोलीस ठाणे, जि. पुणे यांनी कळविले आहे.

तहसिलदार यांनी याप्रकरणी दंडाचे आदेश निर्गिमित करेपर्यंत संबंधित खातेदार यांनी त्यांच्या शेतातून गौण खनिजाची चोरी होत असल्याबाबत गुन्हा दाखल केल्याचे दिसून येत नाही. तथापी संबंधित जमीन धारकांपैकी श्री. तुकाराम आत्माराम कलाटे व इतर यांनी दिनांक ०८.१२.२०२५ रोजी त्यांच्या जमीनीतून खडक व मुरूम उत्खनन करून चोरी होत असल्याबाबत दिलेल्या तक्रार अर्जानुसार व उपलब्ध पंचनाम्यानुसार तहसिलदार कार्यालयाकडून पोलीस स्टेशन शिक्रापूर, ता.शिरुर, जि.पुणे येथे भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३७९, खाण आणि खनिज (नियमन आणि विकास),१९८६ चे कलम ४A, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम,१९८६ चे कलम ९ व १५ नुसार गु.र. क्र. ०८५७ दिनांक ०८.१२.२०२५ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

उपविभागीय अधिकारी पुणे शहर-शिरुर, जिल्हा पुणे यांचेकडे श्री. प्रकाश हुकुमचंद गांधी व इतर यांनी केलेल्या अपीलाची सुनावणी प्रलंबित असून अर्धन्यायीक प्रकरणामध्ये निर्णयानुसार पुढील कार्यवाही अपेक्षित आहे. तसेच पोलीस स्टेशन शिक्रापूर, ता.शिरुर, जि.पुणे येथील गुन्हा नोंद प्रकरणी पोलीस तपासानुसार पुढील कार्यवाही होणार आहे. सबब सद्यस्थितीत याप्रकरणाशी संबंधित महसुली अधिकाऱ्यांवर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

*******

लक्षवेधी सूचना क्र.१४२८

महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे हिवाळी अधिवेशन

मा. श्री.किशोर जोरगेवार, सन्माननीय विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१४२८ पुढीलप्रमाणे आहे :-

*"महाराष्ट्राला संताची आणि मंदिराची गौरवशाली परंपरा लाभलेली असणे, राज्यातील मंदिरे आणि देवस्थाने आपल्या संसकृतीचे आणि श्रध्देची जागृत केंद्रे असणे, राज्यातील अनेक देवस्थास्थांना छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते सामान्य भाविकांपर्यत अनेकांनी जमिनी दान दिलेल्या असणे, तथापि राज्यातील देवस्थानांच्या जमीन सद्य:स्थितीत सुरक्षित नसून देवस्थानाच्या हजारो एकर शेतजमीनी भूमाफियांनी हडपलेल्या असणे, देवस्थान इनाम जमिनी (इनाम वर्ग-३) या कायद्याने अहस्तांतरणीय (non-transferable) असूनही भूमाफियांनी स्थानिक महसूल अधिकारी व कर्मचारी यांच्याची आर्थिक संगनमत करुन मोठ्या प्रमाणात जमीनी हडप केलेल्या असणे, इनाम रजिस्टर आणि गाव नमुना ३ मध्ये बेकायदेशीरपणे फेरफार करुन देवस्थानांची नावे वगळण्यात येणे, देवस्थानच्या जमीनी बळकावण्याचे प्रकार संपूर्ण राज्यात पहायला मिळणे, जमीनी हडपणे हा गंभीर फौजदारी गुन्हा मानणारा सक्षम कायदा आपल्याकडे नसल्यामुळे भूमाफियांना कायद्याचा कोणताही धाक उरलेला नसणे, परिणामी दिवसेंदिवस देवस्थानच्या जमीनी बळकावण्याचे प्रकार उघडकीस येणे, देवस्थान जमिनीच्या संरक्षणासाठी राज्यात गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश व आसाम राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यातही राज्य शासनाने "अॅन्टी लॅन्ड ग्रॅबिंग (प्रतिबंध) कायदा"लागू करण्याची मागणी महाराष्ट्र मंदिर महासंघाकडून शासनाकडे वारंवार करण्यात आलेली असणे, शासनाने याबाबत तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."*

---

मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

राज्यातील देवस्थानांना अनेक राजे व भाविकांनी जमिनी दान दिलेल्या आहेत. अशा देवस्थान इनामाचे जमिनींचे प्रामुख्याने सॉईल ग्रँट व रेव्हेन्यू ग्रँट असे दोन प्रकार आहेत. ज्या जमिनी देवस्थानाला थेट दान करण्यात आलेल्या आहेत अशा जमिनींना सॉईल ग्रँट म्हणतात, तर ज्या जमिनींबाबत जमिनींचा शेतसारा वसूल करण्याचे अधिकार देवस्थानांना दिलेले आहेत त्या जमिनींना रेव्हेन्यू ग्रॅन्ट असे म्हणतात. अशा जमिनींची नोंद ॲलिनेशन रजिस्टरमध्ये केली जाते.

तत्कालीन ब्रिटीश राज्यकर्त्यांनी सारा माफी देण्यात आलेल्या जमिनींची स्वतंत्र नोंद ठेवली आहे. ही नोंदवही म्हणजे दुमाला जमिनीची नोंद वही (Alienation-Register) आहे. आजही ह्या नोंदवह्या अस्तित्वात असून, या देवस्थान इनाम जमिनी बाबतच्या मुळ अभिलेख मानल्या जातात. या नोंदवह्यांमध्ये पुर्णतः अथवा अंशतः सारामाफी दिलेल्या तसेच देवस्थानाला सारा वसुलीचा अधिकार दिलेल्या जमिनींची नोंद आहे.

"जमीन-महसूलाच्या माफीबाबत (क्रमांक १) अधिनियम, १८६३" यामधील तरतुदीनुसार तत्कालीन मुंबई प्रांतातील सर्वसाधारणत: धार्मिक किंवा धर्मदाय संस्थांनी धारण केलेल्या तसेच अंशत: व पूर्णत: सारामाफी असलेल्या जमीनीचे हस्तांतरण करण्यास प्रतिबंध आहे.

राज्यातील देवस्थानांच्या शेतजमीनी भूमाफियांनी स्थानिक महसूल अधिकारी व कर्मचारी यांच्याशी आर्थिक संगनमत करून हडपल्याची बाब अलीकडील काळात निदर्शनास आलेली नाही. तथापि, अंशतः व पूर्णतः सारामाफी असलेल्या देवस्थान जमिनींचे हस्तांतरण बेकायदेशीरपणे वा शासनाच्या परवानगीशिवाय होत असल्याच्या बऱ्याच तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्यानुषंगाने, बेकायदेशीर हस्तांतरणे झालेली आहेत असे निदर्शनास आल्यास, अशा बेकायदेशीर हस्तांतरणाबाबतची प्रकरणे विलंबाचा कालावधी क्षमापित करून स्वतःहून पुनरिक्षणात घेऊन, गुणवत्तेवर योग्य ते आदेश करण्याबाबत महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक दिनांक ३० जुलै, २०१० अन्वये क्षेत्रिय महसूली प्राधिकारी अथवा अधिकारी यांना दिशानिर्देश दिलेले आहेत.

शासन परिपत्रक दिनांक ३० जुलै, २०१० आणि शुध्दिपत्रक दिनांक २९ जून, २०११ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मा. मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.२७५९/२०११, रिट याचिका क्र. १३३५३/२०१६ व रिट याचिका क्र.१३४८८/२०१७ दाखल झाल्या होत्या. त्यानुषंगाने दिनांक १४.०८.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीसमयी मा.उच्च न्यायालयाने क्षेत्रीय पातळीवर कार्यरत महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना देवस्थान जमिनींचा शोध घेणे किंवा त्यांच्या व्यवस्थापकांचा आणि प्रशासकांचा शोध घेणे याबाबत कार्यवाही करण्यासंदर्भात निरीक्षणे नोंदविली होती. सदर निरिक्षणाच्या अनुषंगाने देवस्थान जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरण झाल्याचे निदर्शनास आल्यास अशी प्रकरणे पुनरिक्षणात घेवून तातडीने निकाली काढण्याच्या सूचना शासन परिपत्रक दिनांक ०६.११.२०१८ अन्वये देण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्यातील सर्व विभागात देवस्थान जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरणाचा शोध घेऊन सदर जमिनी पुन:श्च देवस्थानाच्या नावे करण्याबाबत धडक मोहिम राबविण्यात आली होती.

मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.२७५९/२०११ प्रकरणी दिनांक २२/०१/२०२० रोजी आदेश पारित करुन, "ग्रँट ऑफ सॉईल" प्रकारची सनद असलेल्या देवस्थान इनामाच्या जमिनींना शासन परिपत्रक क्रमांक डीईव्ही-२०१०/प्र.क्र.९/ल-४, दिनांक ३०/०७/२०१० मधील तरतूदी लागू राहतील. तसेच "ग्रँट ऑफ रेव्हेन्यू" प्रकारची सनद असलेल्या देवस्थान इनामाच्या जमिनींच्या हस्तांतरणांना सदर शासन परिपत्रकातील तरतूदी लागू होणार नाहीत. मात्र अशा जमिनींचा हस्तांतरिती (transferee) सदर जमिनीचा जमीन महसूल देवस्थानाकडे भरणा करण्यास जबाबदार राहील. असे निर्देश दिले आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत शासन पत्र दिनांक १२.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रीय सर्व विभागीय आयुक्त, आणि सर्व जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

देवस्थान जमिनी बऱ्याच लँड ग्रॅबरव्दारे बेकायदेशीररित्या हडपल्या जात असल्याने महाराष्ट्र शासनाने ॲन्टी लॅड ग्रॅबींग (प्रतिबंध) कायदा आणण्यासाठी अध्यादेश काढण्याबाबत तसेच जमीन हडपणाऱ्या विरोधी विशेष पथकाची नेमणूक करण्याबाबतची निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत. त्यानुसार तपासण्यात येत आहे.

राज्यातील देवस्थान इनाम जमिनींच्या संदर्भात राज्य शासनाची भूमिका ठरविण्याकरिता शासनास शिफारशी करण्यासाठी प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३/०३/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल शासनास अद्यापपर्यंत अप्राप्त आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यावर याबाबत शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षीत आहे.

******

लक्षवेधी सूचना क्रमांक-१७४५

सन २०२५ चे (हिवाळी) अधिवेशन

श्री. विलास तरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"पालघर जिल्ह्यातील विराथनखुर्द या गावात शासकीय नोंदीत तलाव अस्तित्वात नसताना,खोट्या तलावाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर अवैध माती उत्खनन करून शासन, पाटबंधारे विभाग,महसूल विभाग आणि स्थानिक नागरिकांची सरळसरळ फसवणूक करण्यात आलेली असणे,संबंधित गावाच्या सर्वे नं.६०/अ/६ मध्ये कधीही तलाव अस्तित्वात नसणे,तरीही ग्रामपंचायत व काही अधिकारी यांनी संगनमताने"तलाव असल्याचे"खोटे दाखवून गाळ काढण्याची परवानगी मिळवलेली असणे,गुरुचरण जागा असल्यामुळे पहिली परवानगी अमान्य केली गेली होती. मात्र,दुसऱ्या वेळी खोटा तलाव दाखवून जीआर इन्फ्रा कंपनीला गाळ काढण्याची परवानगी मिळवण्यात आली. त्यासाठी ग्रामसभा घेताना ग्रामसेवक उपस्थित नसणे, अंगणवाडी सेविका यांनी खोटे -सचिव॰ दाखवून खोटे ठराव मंजूर करण्यात येणे, मोजणी,क्षेत्र पाहणी न करता तलाव मान्य करणे, १०,००० ब्रास रॉयल्टी घेतल्याचे दाखवले,पण प्रत्यक्षात लाखो ब्रास उत्खनन करताना ब्लास्टिंगचाही वापर केलेला असणे, ब्लास्टिंगमुळे आजूबाजूच्या घरांना मोठ्या भगदाडांचे तडे, बोरवेलचे पाणी आटणे, गावातील मुख्य रस्ते उखडणे,वहिवाट पूर्णपणे नष्ट होणे अशी भयावह परिस्थिती निर्माण झालेली असणे,या सर्व प्रकारांमध्ये ग्रामपंचायत सरपंच,पंचायत सदस्य,सर्कल अधिकारी,मंडळ अधिकारी,लघु पाटबंधारे विभागाचे अधिकारी,यांनी संगनमताने ग्रामस्थांची दिशाभूल करून शासनाला चुकीची माहिती दिलेली असणे,याबाबत शासनाने ग्रामस्थांना संपूर्ण नुकसान भरपाई देण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत असणे यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना."

---

श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे विराथन खुर्द, ता.जि.पालघर येथील गा.न.नं.७/१२ नुसार स.नं. ६०/अ/६ चे एकूण क्षेत्र ५४.४७ हे.आर असून त्यापैकी ५०.५६.६४ हे.आर.चौ.मी. हे गुरचरण सदरी तर ०३.९१.३६ हे.आर.चौ.मी क्षेत्र नॅशनल हाय स्पिड रेल कॉर्पोरेशन लि. यांच्या सदरी दाखल आहे. गा.न.नं.७/१२ नुसार मौजे-विराथन खुर्द ता.जि. पालघर ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नं. ६०/अ/६ मध्ये तलावाची नोंद नाही. जी.आर.इंफ्रा प्रोजेक्ट लि.रा.हिरण नगरी, सेक्टर-२ उदयपूर राजस्थान यांच्याकडून भारतमाला परियोजना अंतर्गत आठ पदरी वडोदरा-मुंबई एक्सप्रेस वे चे शिरसाड ते मासवण दरम्यान भरावाचे काम सुरु आहे. त्यासाठी मौजे-विराथन खुर्द, ता. जि. पालघर येथील भू.क्रं.६०/३/६ क्षेत्र ५४.४८ हे. आर पैकी ०५.०० हे.आर. ही गुरचरण जमीन पाणी अडवा पाणी जिरवा योजने अंतर्गत तलाव उत्खनन करण्यास व गाळ काढण्यास मंजुरी मिळावी म्हणून जी. आर. इन्फ्रा प्रोजेक्टस लि. या कंपनीने ग्रामपंचायतीकडे प्रस्ताव सादर केला.

ग्राम विकास विभागाने उपलब्ध करून दिलेल्या माहितीनुसार मौजे विराथन खुर्द येथे नवीन तलाव खोदकाम करण्यासाठी मे. जी. आर. इन्फ्रा प्रोजेक्ट कंपनीच्या अर्जानुसार गुरचरण सर्वे नंबर ६०/३/६ चे ५ हेक्टर क्षेत्रामध्ये तलाव खोदकाम करण्यास ना हरकत देणेबाबत ग्रामपंचायतीने ग्रामसभा ठराव क्रमांक ११ दिनांक ३१.०८.२०२३ नुसार ठराव करण्यात आलेला आहे. सदर ग्रामसभेला अंगणवाडी सेविका यांनी सचिव म्हणून नेमणूक केलेली सदरच्या ग्रामसभेत तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी श्री विठ्ठल झुंजार उपस्थित होते.

तसेच गावातील अंतर्गत रस्ते उखडणेबाबत, ब्लास्टिंग मुळे आजूबाजूच्या घरांना भेगा पडणे, बोरवेल पाणी आटणे, गावातील मुख्य रस्ते उघडणे, वहिवाट पूर्ण नष्ट होणे अशी प्रवृत्ती निर्माण झालेली असणे याबाबत ग्रामपंचायतकडे ग्रामस्थांची कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त नाही.

ग्रामपंचायत विराथन खुर्द यांनी या जागेत सुमारे पाच हेक्टर एवढ्या परिसरात निसर्ग निर्मित तलाव सदृश्य पाणीसाठा पावसाळ्यात होत असल्याचे तसेच आजूबाजूच्या जमिनीची धुप होऊन या जागेत गाळ जमा झाल्याचे ग्रामपंचायत विराथन खुर्द यांनी निदर्शनास आणून दिल्याने जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग यांनी केंद्र शासनाच्या महामार्ग विकास/रेल्वे मार्ग विकास कार्यक्रमासाठी आवश्यक असलेली माती/मुरूम/दगड या सामुग्री करीता जलसंधारणाच्या उपचारांची सांगड घालण्यांचा मृद व जलसंधारण विभागाचा महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक २९.११.२०१७ नुसार विराथन खुर्द ता. पालघर येथिल तलावासाठी सर्व्हे क्र.६०/अ/६ मध्ये सुमारे ५.०० हेक्टर एवढ्या शासकीय जागेत तलावासाठी खोलीकरण करण्यांसाठी हरकत नसल्याचे अहवालात स्पष्ट केले. त्यासाठी मौजे विराथन खुर्द, ता.जि.पालघर येथील स.नं. ६०/अ/६ क्षेत्र ५४.४७.०० हे.आर. या जागेतून जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडुन एकूण ८०,००० ब्रास माती/मुरूम उत्खनन करण्याची परवानगी देण्यात आली.

श्री.जयवंत जगन्नाथ किणी यांनी जिल्हाधिकारी, पालघर यांच्या कार्यालयाकडे दाखल केलेल्या तक्रारी अर्जाचे अनुषंगाने सदरहू जागेची ईटीएस मोजणी करण्यात आली असता, २०,३४५ ब्रास अतिरिक्त उत्खनन केल्याचे निदर्शनास आले. शासन परिपत्रक दिनांक ०३.०५.२०२१ नुसार जास्तीच्या उत्खननासाठी जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक २९.०७.२०२५ अन्वये एकुण रक्कम रुपये १,३७,१६,८४० /- एवढ्या रक्कमेची नोटीस बजावण्यात आली असता, सदरहू फरकाची रक्कम जी.आर.इंफ्रा प्रो.लि. यांनी शासनजमा केलेली आहे. अशा प्रकारे जी.आर.इंफ्रा प्रो.लि यांनी सदरहू जागेत एकूण ०१,००,३४५ ब्रास करिता रॉयल्टी भरणा केलेली आहे.

ग्रामपंचायत विराथन खुर्द यांनी ग्रामसभा दिनांक ११.११.२०२५ रोजी झालेल्या ग्रामसभेत ठराव क्र.७/४ नुसार सदर जागेत तलाव झाल्यामुळे पाण्याच्या पातळीमध्ये मुबलक प्रमाणात वाढ झाली असून त्याचा फायदा गावातील गुरे, ढोरे व शेतकरी यांना पाण्याचा उपयोग झालेला आहे. गावातील विहिर व कुंपनलिका यांच्या पाणी पातळीत देखील वाढ झाली आले, त्यामुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण असल्याचे जिल्हाधिकारी, पालघर यांनी अहवालात सादर केले आहे.

******

## लक्षवेधी सूचना क्र.१८२१

### महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे हिवाळी अधिवेशन

**मा. श्री.नारायण कुचे, सन्माननीय विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८२१ पुढीलप्रमाणे आहे:-**

*"जालना तालुक्यातील सर्वे नंबर २८८/ब व २८८/क या जमिनी संदर्भात महसूल विभागाकडून गंभीर अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले असणे, सदर तहसीलदार, जालना यांनी दिनांक २४/०५/२०२४, १५/०४/२०२५, ०७/०५/२०२५ व ०४/११/२०२५ रोजी दिलेल्या आदेशांमध्ये परस्परविरोधी निष्कर्ष नोंदविण्यात आले असून, जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या पुरचौंकशीच्या आदेशाची जबाबदारी पुन्हा त्याच तहसीलदारांकडे सोपविण्यात आली असल्या चे निदर्शनास आले असणे, जी प्रशासनिक दृष्ट्या चुकीची व पक्षपातीपणाची शंका निर्माण करणारी असणे तसेच ०४/११/२०२५ च्या आदेशानंतर अपीलाची मुदत न संपता मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी फेरफार क्रमांक १९०८७ व १९०४१ तातडीने नोंदवून अंमलबजावणी केली आहे असेही आढळून आले असणे, सदर या फेरफारात जमिनीचा वर्ग मूळ वर्ग-२ वरून वर्ग-१ असा चुकीने बदलण्यात आलेला असून, नोंद प्रक्रिया, जाहीर प्रकटन व नोटीस देणे या महत्त्वाच्या कायदेशीर पायऱ्या पूर्ण करण्यात आलेल्या नसणेसदर प्रकरणात महसूल अधिकाऱ्यांचे संगनमत असल्याचा गंभीर संशय निर्माण होत असल्याची शक्यता वजा खात्री होत असल्याचेही प्राथमिक अंदाज निष्पन्न होत असणे. त्यामुळे शासनाने किंव्हा महसूल विभागाने या सर्व प्रकरणाची तातडीने स्वतंत्र व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई होण्याची स्थानिक नागरिकांची मागणी असणे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कारवाई किंव्हा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया"*

---

### मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौ.जालना ता.जि. जालना येथील गट न.२८८ब, व २८८क या वाद मिळकत प्रकरणी हैद्राबाद कुळ वहिवाट आणि शेतजमीन अधिनियम १९५० मधील कलम ३८ई मधील तरतूदीनुसार तहसिलदार जालना यांनी दिनांक २४.०५.२०२४ रोजी "अर्जदार जैन्बबी भ्र. मोहम्मद बशीर व इतर यांचा मूळ मालक म्हणून मालकी हक्कात नोंद घेण्याचा अर्ज नामंजुर करण्यात येतो. " असा आदेश पारित केला. सदर आदेशाने व्यथित होवून अपीलार्थी यांनी उक्त अधिनियमाच्या कलम ९० प्रमाणे दिनांक ०५/०७/२०२४ रोजी जिल्हाधिकारी जालना यांच्या न्यायाधिकरणासमोर अपील अर्ज दाखल केला. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक ३०.०७.२०२५ रोजी अपीलार्थी यांचे अपील अंशत: मंजूर करून तहसिलदार जालना यांनी दिनांक २४/०५/२०२४ रोजी पारित केलेले आदेश रद्द करून प्रकरणी फेर चौकशीसाठी तहसिलदार जालना यांना पाठविण्यात आले.

जिल्हाधिकारी जालना यांनी पारित केलेल्या आदेशानुसार प्रकरणी तहसिलदार जालना यांनी वादी व प्रतिवादी यांना सुनावणीची संधी देवून दिनांक ०४/११/२०२५ रोजी आदेश पारित केले. त्यानुसार, अपिलार्थी जैन्नबी भ्र. मोहमंद बशीर व इतर यांचा अर्ज मंजुर करण्यात आला. तसेच मौ. जालना सर्वे नं २८८ब, क्षेत्र ४

हे ३५ आर व २८८क क्षेत्र २ हे ५१ आर या जमिनीचा ताबा मुळ मालक / अपिलार्थी यांना देण्यात यावा तसेच मुळ मालक यांची मालकी हक्कात नोंद घेण्यात यावी असे आदेश पारित केले.

तहसिलदार जालना यांनी दिनांक ०४/११/२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी दिनांक १८/११/२०२५ रोजी फेरफार क्रमांक १९०४१ नोंदवून प्रमाणित केलेला आहे.

तहसिलदार जालना यांनी दिनांक ०४.११.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होवून अपिलार्थी लालसिंग बंडूसिंग वर्मा व इतर (छोटीबाई बजरंगसिंग राजपूत यांचे वारस) यांनी उपजिल्हाधिकारी, जालना यांच्या न्यायालयात दिनांक २१/११/२०२५ रोजी स्थगीती अर्जासह अपील दाखल केले. सदर प्रकरणी दिनांक ०१/१२/२०२५ रोजी तहसिलदार, जालना यांच्या आदेशास पुढील सुनावणी दिनांक २२/१२/२०२५ पर्यंत स्थगीती दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा. विधानसभा सदस्य, बदनापुर यांच्याकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी अपर आयुक्त (महसूल) विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांचेकडील दिनांक ०९.१२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये अपर जिल्हाधिकारी जालना यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्य चौकशी समिती स्थापन केली असुन अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

तसेच, दरम्यानच्या काळात अर्जदार छोटीबाई बजरंगसिंग राजपूत व इतर यांनी मौजे जालना सर्वे नं.२८८/ब व २८८/क मधील जमीन वर्ग-२ मधून वर्ग १ करण्याकरीता दिनांक १९.०७.२०२३ रोजी तहसिलदार, जालना यांच्याकडे अर्ज दाखल केला होता. तथापि, सदर अर्जास जैनब्बी मोहम्मद बशीर व इतर (मूळ मालक) यांनी आक्षेप घेतल्यामुळे उभय पक्षकार यांना सुनावणीची संधी देवून दिनांक ०७.०१.२०२५ रोजी तहसिलदार, जालना यांनी आदेश पारीत केले. त्यानुसार अर्जदार छोटीबाई बजरंगसिंग राजपूत व इतर यांचा अर्ज मंजुर करुन अर्जदार (छोटीबाई बजरंगसिंग राजपूत व इतर) यांच्याकडून शासन निर्णय दिनांक १६ जुलै २०१४ मधील विहीत तरतुदीनुसार ४० पट नजराणा रक्कमेचा भरण्यात करण्यात आला. व त्यानुसार सदर जमीन भोगवटदार वर्ग-२ मधून वर्ग-१ करण्याकरीता दिनांक ०७.०५.२०२५ व दिनांक १४.०४.२०२५ रोजीच्या अन्वये मंडळ अधिकारी जालना शहर व ग्राम महसूल अधिकारी जालना शहर यांना आदेशीत करण्यात आले. त्यानुसार सदर जमिनीचा भोगवटदार वर्ग-१ म्हणून दिनांक २८.११.२०२५ रोजी फेरफार क्रमांक १९०८७, अन्वये फेरफार घेण्यात आला आहे. तथापि, सदर फेरफार क्रमांक १९०८७ यास दिनांक ०१.१२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये उपविभागीय अधिकारी जालना यांनी स्थगिती दिली आहे.

**********

लक्षवेधी सूचना क्र.१५२०

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे तृतीय (हिवाळी ) अधिवेशन

**श्री. उत्तमराव जानकर, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१५२० पुढीलप्रमाणे आहे:-**

"माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील निरा-देवघर व गुंजवणी प्रकल्प धरणाचे कालवे कार्यान्वित नसल्यामुळे निरा-देवघर प्रकल्पाचे पाणी व गुंजवणीचे पाणी निरा उजवा कालव्यास उपलब्ध होत नसणे, त्यामुळे निरा उजवा कालव्याच्या मुळ लाभक्षेत्रावर त्याचा विपरित परिणाम होणे, निरा-देवघर प्रकल्पांतर्गत तालुक्यातील मुख्य कालवा कि.मी. १३४/७६० खाजगी/सहकारी उपसा सिंचन योजणेचे काम प्रलंबीत असणे, सदरच्या खाजगी उपसा सिंचन योजने एवजी शासकीय उपसा सिंचन योजणा करुन माळशिरस तालुक्यातील १६ दुष्काळग्रस्त गावांना पाणी मिळणेबाबत लोकप्रतीनीधींची मागणी असणे, त्यानुषंगाने निरा-देवघर प्रकल्पांतर्गत तालुक्यातील खाजगी उपसा सिंचन योजने ऐवजी शासकीय उपसा सिंचन योजनेचा प्रस्ताव शासनास प्राप्त असणे, त्यानुसार शासन निर्णय, धोरण व पाणी उपलब्धता इ. बाबींचा अभ्यास करुन सदर प्रकरणी शासनाकडुन कार्यवाही होत नसणे, निरा-देवघर प्रकल्पाचा नुख्य कालवा १५८ किं. मी. लांबीचा असुन, किमी ० ते ६५ मधील कालवा कामे पारंपारीक उघड्या पद्धतीने झाली असुन किमी. ६५ ते १५८ हा बंदिस्त नलीकेद्वारे प्रस्तावित कामे प्रलंबीत असणे, किमी ६६ ते ८७ ची प्रगतीत असलेली कामे अध्यापी प्रलंबीत असणे, सदरच्या कामाच्या खर्चाचा प्रकल्पाच्या मंजुर तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये समावेश असुन निधीअभावी सदरहु कामे प्रलंबीत असणे, याबाबत शासनाने चौकशी करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

**मा.मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन.**

माळशिरस (जि.सोलापुर) तालुक्यातील निरा देवघर प्रकल्पाच्या रु. ३९७६.८३ कोटीच्या तृतीय सुप्रमा प्रस्तावास शासन निर्णय, दि.०८/०३/२०२३ अन्वये मान्यता प्राप्त आहे. निरा देवघर मुख्य कालवा कि.मी. १ ते ६५ पर्यंतचे काम पारंपारिक उघड्या पद्धतीने पूर्ण झाले असून, सन २०१६-१७ पासून नियमितपणे कालव्यामध्ये पाणी सोडण्यात येत आहे. उर्वरीत ६५ ते १३५ कि.मी. कालव्याचे बंदिस्त नलिका वितरण प्रणालीची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच गुंजवणी प्रकल्पाच्या कालव्याची बंदिस्त नलिका वितरण प्रणालीची कामे प्रगतीपथावर आहेत.

शासन निर्णय, दि.२४.०२.२०२० अन्वये निरा-देवघर व गुंजवणी धरणाचे कालवे कार्यन्वित होईपर्यंत विनावापर राहणारे पाणी समन्यायी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नीरा डावा कालवा (५५ %) व निरा उजवा कालवा (४५ %) क्षेत्रीय वाटपाअंतर्गत (Sectoral Allocation) सिंचन प्रवर्गासाठी वापरण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर विनावापर राहणाऱ्या पाण्याचे समन्यायी वाटपाचे हे तत्व निरा देवघर व

गुंजवणी प्रकल्पाचे कालवे वितरण प्रणालीतून सिंचनाचा वापर पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी लागू राहील, असे शासन निर्णयामध्ये नमूद आहे.

निरा देवघर प्रकल्पांतर्गत माळशिरस तालुक्यातील १६ दुष्काळग्रस्त गावांसाठी सहकारी एवजी शासकीय उपसा सिंचन योजनेस दि.२७/१०/२०२५ रोजीच्या शासन पत्रान्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर उपसा सिंचन योजनेचे काम करण्यासाठी आवश्यक असणारे सर्वेक्षण, संकल्पन व अंदाजपत्रक तयार करणेच्या कामाची निविदा कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

निरा देवघर मुख्य कालवा कि.मी. १ ते ६५ पर्यंतचे काम पारंपारिक उघड्या पद्धतीने पुर्ण झाले असून, सन २०१६-१७ पासून नियमितपणे कालव्यामध्ये पाणी सोडण्यात येत आहे. कि.मी. ६५ ते ८७ मधील बंदिस्त नलीका वितरण प्रणालीचे काम ८५% भौतीकदृष्ट्या पुर्ण झाले आहे व शाखा कालव्याचे काम ९०% पुर्ण झाले आहे. निरा देवघर उजवा मुख्य कालव्याचे कि.मी. ६५ ते ८७ व शाखा कालव्याचे काम जून, २०२६ पर्यंत पूर्ण करुन प्रत्यक्षात लाभ देण्याचे नियोजन आहे. तसेच उजवा मुख्य कालव्याचे कि.मी. ८७ ते १३४ चे काम प्रगतीपथावर आहे. सन २०२५-२६ या अर्थिक वर्षामध्ये निरा-देवघर प्रकल्पास २७४ कोटी रुपयांची तरतूद झाली असून सुरु असणारी सर्व कामे विहित कालावधीमध्ये पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

**********

**लक्षवेधी सूचना क्र.६७३**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे हिवाळी अधिवेशन**

**मा. श्री.नानाभाऊ पटोले, मा.श्री.नरेंद्र भोंडेकर, मा. श्री.संजय मेश्राम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ६७३ पुढीलप्रमाणे:-**

"मौजा भोजापूर, ता, जि.भंडारा येथील गट क्र. १९९ व इतर गटातील अधिकृत जागेचे रहिवाशांच्या गोसेखुर्द प्रकल्पावी २१/३/१९९७ च्या अधिसूचनेनुसार मौजा भोजापूर येथील गोसेखुर्द प्रकल्पबाधीत २०.६२ हे. आर जमीन संपादीत करावयाची होती परंतु प्रत्यक्षात १२.५५ हे.आर एवढीच जमीन संपादीत करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, ८.०७ हे.आर. जमीन अजूनही बाधित असुन ती अद्यापही संपादीत करण्यात आलेली नसणे, उर्वरित जमीन संपादीत करण्याकरिता संबंधित प्रकल्पग्रस्तांनी वारंवार निवेदन, आंदोलने करुनही शासन दुर्लक्ष करीत असणे, त्यानंतर पिडीतांनी मा. उच्च न्यायालयात संबंधित क्षेत्राचे कागदपत्रे व पुरावे तपासून संबंधित क्षेत्राचे भूसंपादन व पुनर्वसनाची कार्यवाही १२ आठवडयात करण्याचे आदेश देण्यात येणे, पंरतु अद्यापही संबंधित जिल्हाधिकारी भंडारा व संबंधित अधिकारी यांनी अद्यापही कोणत्याही प्रकारची कार्यवाही सुरु केली नसल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये निर्माण झालेली चिड व उद्रेकाची भावना लक्षात घेता शासनाने त्वरीत याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**मा. मंत्री, जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन**

गोसीखुर्द प्रकल्प हा पूर्व विदर्भातील महत्वाकांक्षी बांधकामाधीन प्रकल्प असून या प्रकल्पातंर्गत भंडारा,नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण २,५९,५१२ हेक्टर सिंचन क्षेत्रास लाभ होणार आहे. सद्यस्थितीत २,०९,८८० हेक्टर (८० टक्के) सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

गोसीखुर्द प्रकल्पा करिता एकुण ३७९४५.९९ हे.आर जमीनीची आवश्यकता असुन सदर जमीनी पैकी वनजमीन ३,१४४.०६ हेक्टर, शासकीय जमीन ५,५८२.१५ हेक्टर व २९,०५५.४३ हेक्टर खाजगी जमिनीचे भुसंपादन झाले आहे. उर्वरित १२३.१३ खाजगी जमीन, २.४२ शासकीय जमीन व ३८.८० हेक्टर वनजमिन क्षेत्राचे भुसंपादन प्रगतीपथावर आहे.

प्रकल्पग्रस्त पुनर्वसन अधिनियम १९८६ नुसार कलम १३ अंतर्गत २१/०३/१९९७ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचनेत प्रभावित क्षेत्राचा तपशील जाहीर करण्यात आला असून मौजा भोजापूर क्र. ७८ वर २०.६२ हेक्टर क्षेत्र दाखविले आहे. शासन निर्णय, दिनांक १७/०१/१९७५ अन्वये गोसीखुर्द प्रकल्पाचे भुसंपादन पूर्ण संचय पातळी ( २४५.५० ) +०.५ मी.= २४६.०० मी. या तलांकापर्यंत करण्यात आले आहे. सन २००७ मध्ये संयुक्त मोजणी अहवाल (JMR )

क्र.७४/२००७ प्रकाशित झाला असून त्यामध्ये २०.६२ हेक्टर पैकी १२.८६ हेक्टर क्षेत्राचा समावेश होता.

मौजा भोजापूर, ता.जि.भंडारा येथील गट क्र.१९९ व इतर गटांबाबत स्थानिक भूधारकांची २४६.०० मी. तलांकावरील अतिरिक्त जमिनीच्या भुसंपादन व पुनर्वसनाची मागणी आहे. मागणी असलेले ७.७६ हेक्टर क्षेत्र हे २४६.०० मी. तलांकावरील क्षेत्र असून बूडीत क्षेत्राकरीता संपादित करावयाच्या जमिनीबाबतच्या नियमानुसार हे क्षेत्र संपादित करण्याची आवश्यकता नाही.

सदर प्रकरणी WRIT PETITION क्र.६०६६/२०२५ नुसार मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर यांचे दि.११.११.२०२५ रोजी निर्गमीत आदेशात "कागदपत्रे व पुरावे तपासून नियमानुसार १२ आठवड्यात कार्यवाही करण्याचे" नमूद आहे. त्या अनुषंगाने उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी करुन प्रचलित नियमानुसार आवश्यक कार्यवाही करणे नियोजित आहे.

**********

लक्षवेधी सूचना क्र.७०७

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे हिवाळी अधिवेशन**

**मा. श्री.रवी राणा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ७०७ पुढीलप्रमाणे:-**

"अमरावती जिल्ह्यातील निम्न पेढी प्रकल्पामुळे हातुर्णा, अळणगाव, गोपगव्हाण, कुंडखुर्द, कुंड-सर्जापूर, सावरखेड व ततारपूर ही गावे मोठ्या प्रमाणात बाधित झाली असणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या पाठपुराव्यानुसार जिल्हाधिकारी अमरावती यांनी शासनाला पाठवलेल्या प्रस्तावात प्रकल्पग्रस्तांच्या महत्त्वाच्या व न्याय्य मागण्यांचा समावेश असणे, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राच्या ऐवजी ऐच्छिक स्वरूपात रु ५,२५,००० "खासबाब" मदत देण्याची मागणी असून यामुळे गरीब कुटुंबांचे शिक्षण, उपजीविका व भविष्यातील गरजा पूर्ण होतील. पुनर्वसित भुखंडांवरील सातबाऱ्यात नमूद कब्जा-हक्काची रक्कम कमी करावी, तसेच २०१३ च्या भूसंपादनात काहींना १.५ तर काहींना २ चा गुणक देण्यात झालेल्या विषमतेचा थांगपत्ता लावून सर्वांना सरसकट २ च्या गुणकाने मोबदला द्यावा. गावठाणातील बेघरांना पुनर्वसित ठिकाणी भुखंड मिळावा व शिल्लक शेतीसाठी पोच-रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण करावे. सावरखेड-ततारपूर येथील १६९ मालमत्ता धारकांना नियमित लाभ मिळावा तसेच वलगावमार्गे सावरखेड व कुंडखुर्द शेतजमिनींसाठी पर्यायी रस्ता करावा. वासेवाडी गावाचे प्रलंबित पुनर्वसन तातडीने मंजूर करणे अत्यावश्यक असणे, ही मागणी प्रकल्पग्रस्तांच्या न्याय व सुलभ पुनर्वसनासाठी तातडीने शासनाने मान्य करण्यात यावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**मा. मंत्री, जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन**

निम्न पेढी प्रकल्प हा अमरावती जिल्ह्यातील भातकुली तालुक्यातील पेढी नदीवर बांधण्यात येत आहे. प्रकल्पाची मंजूर द्वितीय सुप्रमा किंमत रु.१६३९.४३ कोटी इतकी आहे. सदर प्रकल्प हा मा. राज्यपालांच्या अनुशेष निर्मुलन प्रकल्पाच्या यादीत व PMKSY अंतर्गत आहे. या प्रकल्पाद्वारे ७५.२६६ द.ल.घ.मी. (२१३१.३० टिएमसी) पाणीसाठा निर्माण करुन अमरावती व अकोला जिल्ह्यातील १२२३० हे. क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे उद्दीष्ट आहे.

निम्न पेढ़ी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील सात गावांपैकी मौजा अळणगाव, गोपगव्हाण, हातुर्णा, कुंडखुर्द व कुंडसर्जापुर या ५ गावांच्या नागरी सुविधांची कामे पुर्ण करण्यात आली असुन जिल्हा परिषद अमरावती यांना हस्तांतरीत करण्यात आली आहेत.

प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राच्या ऐवजी ऐच्छिक स्वरूपात रु.५,२५,०००/- "खासबाब" मदत देण्याची मागणी, पुनर्वसित भुखंडांवरील सातबाऱ्यात नमूद कब्जा-हक्काची रक्कम कमी करणे व गुणांक २ नुसार मोबदला देणे या सर्व बाबी प्रचलित धोरणामध्ये अंतर्भूत नसल्याने देय ठरत नाही.

गावठाणातील बेघरांना पुनर्वसित ठिकाणी भुखंड मिळावा याबाबत प्रकल्पातंर्गत बाधित गावठाणातील बेघर कुटुंबाना भूखंड देण्याबाबत पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील तरतूदीनुसार निकषांची पुर्तता करणाऱ्या एकूण प्राप्त १०५ अर्जापैकी ५७ पात्र बेघर व्यक्तींना प्रकल्पबाधित म्हणून पुनर्वसित गावठाणात रहिवास प्रयोजनार्थ प्रत्येकी १८५ चौ.मी. भूखंडाचा लाभ देण्यात आलेला आहे.

मौजे सावरखेड व ततारपुर ता.भातकुली, जि.अमरावती येथील भुसंपादन प्रक्रियेमधुन वगळण्यात आलेल्या भुधारकांची यादी नुसार एकुण १६९ अतिक्रमीत मालमत्ता धारकांना प्रति कुटुंब ९२.९३ चौ.मी. (२००० चौ. फुट) चे भुखंड देण्यासाठी विशेष बाब म्हणुन देणेबाबत विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाने मान्यता दिली आहे. तसेच वलगाव मार्गे सावरखेड व कुंडखुर्द शेतजमिनीसाठी ओझरखेड गट क्र. ३६ ते सावरखेड वाडा पर्यंत ३.६६५ कि.मी. लांबीच्या पर्यायी रस्त्याच्या खर्चास विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाने मान्यता दिली आहे. सदर रस्त्याबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार कोणत्याही गावातील शेतजमिनीपैकी ७५% पेक्षा जास्त जमीन प्रकल्पासाठी संपादित केली असल्यास त्या गावठाणाचे पुनर्वसन करण्याची तरतूद आहे. परंतु वासेवाडी हे गाव धरणाच्या खालील बाजुस असल्याने त्याचे पुनर्वसन करण्याची तरतूद प्रचलित धोरणामध्ये नाही.

**********

लक्षवेधी सूचना क्र. ९९३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे तृतीय हिवाळी अधिवेशन

**श्री.विजय वडेट्टीवार,विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.९९३ पुढीलप्रमाणे आहे. :-**

"तापी पाटबंधारे अंतर्गत बोदवड उपसा सिंचन योजना ला सन १९९९ मध्ये प्रथम मान्यता देण्यात येणे, सदर मान्यतेनंतर हे काम सुरू होत असणे, या उपसा सिंचन योजनेअंतर्गत जळगाव जिल्ह्यातील व बुलढाणा जिल्ह्यातील काही तालुक्यांच्या लाभ क्षेत्रात समावेश होत असणे, सदर उपसा सिंचन योजनेचा लाभ क्षेत्र ४२४२० हेक्टर असणे, त्याचा नंतर बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा तालुका व मलकापूर तालुक्याच्या समाविष्ट करण्यात येणे, सदर योजना उत्तर महाराष्ट्राची असून या योजनेला विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अंतर्गत क्षेत्रातील लाभ क्षेत्र दाखवून विदर्भाचा निधी वापरल्या असल्याची माहिती समोर येणे, परंतु याबाबतीत विविध तक्रार झाल्यानंतर विदर्भ क्षेत्रात काम कामना झाल्याने सदर निधी वापरला घेतले असल्याचे सुद्धा समोर येणे, यामुळे विदर्भातील प्रकल्पावरती परिणाम होणे परिणाम स्वरूपी या निधीची किती काम करण्यात आले व कोणते काम करण्यात आले या सर्व प्रकरणाची तपास यंत्रणेमार्फत चौकशी होणे गरजेचे असणे, यामध्ये तापी पाटबंधारे येथील प्रमुख अधिकारी यांनो मोठ्या प्रमाणात निधीच्या भ्रष्टाचार करत असणे व ज्या ठेकेदाराला काम देण्यात आले त्याला देयके ना देता, ज्या व्यक्तीला काम सब लेट करण्यात आलेला आहे त्याच्या नावाने देयके देत असल्याची तक्रार होत असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

**मा. मंत्री, जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन.**

बोदवड परिसर उपसा सिंचन योजना या प्रकल्पास तापी पाटबंधारे विकास महामंडळाने दि.०१/०९/१९९९ रोजी रु.६८९.१४ कोटी इतक्या किंमतीस नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. तद्नंतर दि.०४/११/२००८ रोजीच्या निर्णयानुसार अन्वये रु.१५०८.२३ कोटी किंमतीस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता (सुप्रमा) प्रदान केली आहे. त्यानुसार हतनूर जलाशयातून ७.०१ टीएमसी पाणी उचलून प्रथम टप्प्यात जुनोने धरणात ४.२६ टीएमसी व द्वितीय टप्प्यात जामठी धरणात १.५२ टीएमसी पाणी साठविण्याचे नियोजित आहे. या प्रकल्पाद्वारे जळगांव जिल्ह्यातील बोदवड, मुक्ताईनगर व जामनेर या तालुक्यातील २६७२१ हेक्टर व बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर व मोताळा तालुक्यातील १५६९९ हेक्टर अशा एकूण ४२४२० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ प्रस्तावित आहे.

सदर द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता (सुप्रमा) घेतांना विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने दि.१४/११/२००६ च्या पत्रान्वये या योजनेस संयुक्त प्रकल्प म्हणून हाती घेण्यास सहमती कळविली आहे. त्यानुसार तापी पाटबंधारे विकास महामंडळ व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या अंतर्गत योजनेचे लाभक्षेत्र अनुक्रमे ६३:३७ या प्रमाणात आहे. सदर योजनेअंतर्गत टप्पा-१ च्या कामास प्रत्यक्ष सुरुवात

करण्यासाठी मा.मंत्री मंडळाने शासन निर्णय दि.०३/०१/२०१७ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

१) जुनोने धरण -- जुनोने धरणाचे काम ८५% पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीत आहे.

२) उपसा प्रणाली- उपसा प्रणालीचे काम ६०% पूर्ण झाले असून उर्वरित कामे प्रगतीत आहे.

३) बंदिस्त वितरण प्रणाली- योजनेच्या ३२५४० हेक्टर लाभक्षेत्रास सिंचन सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी दाबयुक्त बंदिस्त वितरण प्रणालीच्या कामास सुरुवात करण्यात आलेली आहे.

योजनेवर माहे ऑक्टोबर-२०२५ अखेर रु. १९३६.६२ कोटी खर्च झालेली असून त्यापैकी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडून रु.९०७.०५ कोटी निधी व तापी पाटबंधारे विकास महामंडळाकडून रु.१०२९.५७ कोटी निधी प्राप्त झाला आहे. योजनेच्या टप्पा-१ अंतर्गत विदर्भातील बुलढाणा जिल्हयातील मलकापूर व मोताळा तालूक्यातील १५६९९ हेक्टर इतक्या क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळण्यासाठी बंदिस्त वितरण प्रणालीचे काम हाती घेण्यात आले आहे.

सदर प्रकल्पाच्या टप्पा-१ चे काम मे.आय.व्ही.आर.सी.एल, युनिटी इन्फ्राप्रोजेक्ट लि., मुंबई व बॅकबोन प्रोजेक्टस लि, अहमदाबाद या संयुक्त उपक्रमास क- निविदेद्वारे देण्यात आले आहे. मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचे दि.०२/०७/२०१५ च्या पत्रान्वये जुनोने धरणाचे काम - मे.चक्रधर कॉन्ट्रॅक्टर्स अॅन्ड इंजिनिअर्स प्रा.लि, जळगांव तसेच उपसा प्रणालीचे काम मे.चक्रधर-पी.आय.पी.एल, संयुक्त उपक्रम, जळगांव यांना सबलेट करण्यात आले आहे व सदर पत्रानुसार प्रत्यक्षात झालेल्या कामाची अदायगी सबलेट करण्यात आलेल्या अभिकरणास करण्यात येत आहे. प्रकरण गंभीर असल्यामुळे दक्षता विभागामार्फत चौकशी सुरु आहे.

**********

लक्षवेधी सूचना क्र. १३२६

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

मा. श्री. प्रविण तायडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१३२६ खालील प्रमाणे आहे.

"अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील वासनी या मध्यम प्रकल्पला ८०० कोटीची सुधारित प्रशासकीय मान्यता मंजूर असून या प्रकल्पाचे काम २०१७ पासून अपूर्ण असणे, या वासनी धरणाचे काम अजूनपर्यंत अपूर्ण असून १५७ कोटीचे पीडीएनच्या कामाचे टेंडर काढण्यात आले असणे, धरणाचे कामच अजून अपूर्ण आहे तर पीडीएनच्या कामाचे टेंडर कसे काय काढण्यात आले हा प्रश्न निर्माण झाला असणे, या प्रकल्पाचा निधी अजूनही अखर्चित रूपात पडलेला असून वासनी प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या नागरिकांना व शेतकरी सिंचनापासून वंचित असणे, धरणाचे काम अपूर्ण असताना १५७ कोटीचे पीडीएनच्या कामाचे टेंडर कसे काय काढण्यात आले याची चौकशी करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तात्काळ कारवाई करण्याची गरज, यात दोषी असणा-यांविरुद्ध करावयाची कडक करावाई व शासनाची प्रतिक्रिया".

मा. मंत्री (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन

वासनी मध्यम प्रकल्प हा अमरावती जिल्हयातील अचलपूर तालुक्यात असून, सदर प्रकल्पाचे ४३१७ हेक्टर सिंचन क्षेत्र अमरावती जिल्हयातील अचलपूर,अंजनगाव सुर्जी व दर्यापूर या तालुक्यातील आहे. वासनी मध्यम प्रकल्पाचा प्रकल्पीय पाणीसाठा २२.५९ द.ल.घ.मी. आहे. या प्रकल्पास सन २००८ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून धरणाचे काम नोव्हेंबर,२००८ पासून सुरु करण्यात आले आहे. या प्रकल्पास शासनाने दिनांक २१/०२/२०२३ रोजी रुपये ८२६.११ कोटी किंमतीस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सद्यस्थितीत मातीधरणाचे काम ६०% पूर्ण झाले असून सांडव्याचे काम ८०% पूर्ण झाले आहे. धरण व बुडीत क्षेत्रासाठी आवश्यक ६३६ हे. जमीनीचे भुसंपादन पूर्ण झाले आहे. प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील पुर्णत: बाधीत चारही गावठांणासाठी नागरी सुविधांची कामे पुर्ण झाली असून जिल्हा परीषद,अमरावती यांचेकडे हस्तांतरीत झालेली आहेत. प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील बोरगाव पेठ या अशंत : बाधीत गावाच्या पुर्णत: पुनर्वसनास विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाने मान्यता दिली असून पुनर्वसनाची कार्यवाही प्रगतीत आहे. एकंदरीत प्रकल्पाचे ७०% काम, बुडीत क्षेत्राचे १०० % भूसंपादन व पुनर्वसनाचे ७०% पेक्षा जास्त काम पूर्ण झालेले आहे. सदर प्रकल्पाची घळभरणी जून,२०२७ पर्यंत करुन पाणीसाठा निर्मितीचे नियोजन आहे.

या पार्श्वभुमीवर जून-२०२७ अखेर पाणीसाठा निर्माण झाल्यानंतर तात्काळ सिंचनाचा लाभ देण्यासाठी वितरण व्यवस्था ५०% पूर्ण करणे शासन परिपत्रक दि. १५/०७/१९८३ नुसार गरजेचे आहे. त्यामुळे समांतररित्या नलिका वितरण प्रणालीची कामे पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सबब,सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नसल्याने चौकशी अथवा कारवाईची आवश्यकता नाही.

**************

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग लक्षवेधी सूचना क्र.१०२५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

श्री. राजेंद्र गावित, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.१०२५ पुढीलप्रमाणे आहे:-

"पालघर जिल्ह्यातील तारापुर तालुक्यातील MIDC औद्योगिक क्षेत्रात सुमारे १३०० कारखाने अस्तित्वात असून, शहरातील झपाट्याने होणारे नागरीकरण व औद्योगिकीकरण यामुळे पानेरी नदीचे प्रदूषण वाढले असुन घरगुती व औद्योगिक सांडपाणी योग्य प्रक्रिया न करता थेट नदीत सोडल्याने नदी प्रदूषित होणे, काही टँकर चालक व कारखानदारांच्या संगनमतामुळे खाडीतील जलस्रोतही अधिक प्रदूषण होणे, अलीकडेच खाडीत केमिकल टाकल्यामुळे हजारो टन मासे मरण पावले, याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाची कारवाई अपयशी ठरणे, या गंभीर परिस्थितीत पालघर शहरासाठी तातडीने सांडपाणी प्रक्रिया संयंत्र (STP- Sewage Treatment Plant) प्रकल्प व MIDC साठी सामायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र (CETP- Common Effluent Treatment Plant) उभारण्याबाबत ठोस उपाययोजना करण्याची तसेच सर्व कारखान्यांवर कठोर कारवाई करुन तारापूर MIDC क्षेत्रातील पानेरी नदी प्रदुषणाचा प्रश्न तात्काळ निकाली काढण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.."

.....

मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) यांचे निवेदन

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ तारापूर, बोईसर या औद्योगिक वसाहतीची स्थापना सन १९७२ मध्ये झाली. सदर औद्योगिक वसाहतीमध्ये मुख्यत्वे मोठे, मध्यम व लहान प्रकारचे रासायनिक, औषध निर्मिती, किटकनाशक निर्मिती व कापड यांवर प्रक्रिया करणारे तसेच इंजिनीअरींग कारखाने कार्यरत आहेत. प्रदूषणाच्या पातळीनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगांची वर्गवारी करण्यात येते. त्यानुसार लाल संवर्गात एकूण ५१२ उद्योग, नारंगी संवर्गात एकूण ९० उद्योग व हिरवा संवर्गात एकूण ६१४ असे एकूण १२१६ उद्योग आहेत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, तारापूर या औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमधून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर उद्योग निहाय प्राथमिक, व्दितीय, व तृतीय स्वरुपाची प्रक्रिया करण्यात येते. प्रक्रियेनंतर सदर प्रक्रियाकृत सांडपाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भुयारी गटारीद्वारे औद्योगिक क्षेत्रातील तीन वेगवेगळ्या ठिकाणी असणाऱ्या सम्प क्र. १, ३ व ४ यामध्ये गोळा केले जाते. तद्नंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाव्दारे पम्पिंग तसेच गुरुत्वाकर्षण वाहिनीद्वारे नवीन २५ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेच्या सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रात पुढील प्रकियेसाठी सोडण्यात येते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत टी.ई.पी.एस.-सी.ई.टी.पी. या संस्थेला अटी व शर्तीसह प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाण्यावर पुढील प्रक्रिया करण्यासाठी संमतीपत्र प्रदान करण्यात आले आहे. सदर सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रात औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया केल्यानंतर प्रक्रियाकृत सांडपाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संम्प क्रं. ५ मधून राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेने निर्धारित केल्याप्रमाणे अरबी समुद्रात समुद्र किनाऱ्यापासून ७.१ कि.मी अंतरावर सोडून त्याची विल्हेवाट लावली जाते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रातून प्रक्रियाकृत सांडपाण्याचे नमुने नियमितपणे संकलित करण्यात येतात व त्यांचे पृथःकरण अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतात. मागील वर्षामध्ये वेळोवेळी संकलित करण्यात आलेल्या पृथःकरण अहवालाचे अवलोकन केले असता सीईटीपी मधील प्रक्रीयाकृत सांडपाण्यामध्ये टप्या-टप्याने सुधारणा झाल्याचे निदर्शनास येते.

औद्योगिक वसाहतीलगत वाढलेल्या लोकवस्ती मधून निर्माण होणाऱ्या घरगुती सांडपाण्याचे संकलन व त्यावरील प्रक्रियेचा अभाव आणि काही वेळेस वसाहतीतील औद्योगिक सांडपाणी वाहून नेणारी पाईप लाईन फुटणे, चेंबर तुंबणे व ती काही भागात बंद असणे यामुळे औद्योगिक वसाहतीमधून, सभोवतालच्या नाल्यातून किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पावसाळी पाणी वाहून नेणाऱ्या गटारीत मिसळून सदर सांडपाणी खाडीपर्यंत वाहून जाण्याच्या घटना निदर्शनास आल्यास त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत त्वरित कारवाई करण्यात येते. विनाप्रक्रिया औद्योगिक सांडपाणी नाल्यात सोडल्याची कोणतीही घटना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निदर्शनास आलेली नाही. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीमधून निर्माण होणाऱ्या औद्योगिक सांडपाणी वाहून नेणाऱ्या वाहिनींचे फुटणे, चेंबर तुटणे अशा घटना निदर्शनास आल्यानंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला तात्काळ कळवून त्याची देखभाल व दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात येते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत राष्ट्रीय जल गुणवत्ता अभियानांतर्गत दरमहा केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने नेमून दिलेल्या खारेकुरण मुरबे, दांडी, नवापूर, उच्छेळी, सरावली या ठिकाणचे पाण्याचे नमुने संकलित करण्यात येतात व त्यांचे पृथःकरण अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतात. सदर सांडपाण्याच्या पृथःकरण अहवालावरून समुद्राच्या पाण्याची गुणवत्ता खालावल्याचे निदर्शनास आले नसल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

औद्योगिक सांडपाण्याचा टँकरमार्फत विसर्ग केल्यामुळे जल प्रदूषण झाल्याची घटना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळा यांचे कार्यालयाच्या निदर्शनास आलेली नाही. तथापि, दि.०५.०३.२०२५ रोजी मुरबे खाडी येथे मासे मर्तुकीची घटना घडल्याबाबत मत्स्य विभाग, पालघर यांच्या कार्यालयाकडून माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयाकडे प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर ठिकाणी भेट दिल्यानंतर खाडीच्या पाण्यामध्ये काही तुरळक प्रमाणात लहान मासे मेल्याचे आढळून आले. तसेच भेटी दरम्यान खाडीच्या पाण्याला कोणताही रंग व वास आढळून आला नाही. खाडीच्या पाण्याच्या पृथःकरण अहवालनुसार खाडीच्या पाण्याची जैविक प्राणवायु मागणी (बी.ओ.डी.) ५.२ मिली ग्रॅम प्रतिलिटर इतकी आढळून आली आहे. तद्नंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयास मासे मर्तुकीच्या तक्रारी अथवा घटना निदर्शनास आलेल्या नाहीत.

पालघर तालुक्यात खाजगी औद्योगिक वसाहतीमध्ये मुख्यत्वे इंजिनियरींग, औषधनिर्मिती, वस्त्रोद्योग इत्यादी प्रकारचे कारखाने अस्तित्वात आहेत. सदर औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संमतीपत्र देण्यात आलेली आहेत. सदर उद्योगांतून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता प्राथमिक, द्वितीय व तृतीय स्वरुपाची प्रक्रिया संयत्रणा उभारलेली असून प्रक्रियाकृत सांडपाण्याचा उद्योगांमार्फत पुनर्वापर करण्याचे अथवा उदयोगांच्या आवारात बागबगीचांसाठी वापरण्याची अट संमतीपत्रामध्ये अतंर्भूत करण्यात आलेली आहे.

पानेरी नदी पालघरच्या पूर्वेस असलेल्या डोगंराळ प्रदेशात उगम पावते व पुढे माहिम, चिंटुपाडा, अल्याळी या गावाच्या हद्दीतून वाहत जाऊन शेवटी वडराई या गावाजवळ अरबी समुद्रास मिसळते. पालघर नगर परिषदेच्या हद्दीत घरगुती सांडपाणी, सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा अस्तित्वात नसल्यामुळे घरगुती सांडपाणी विना प्रक्रिया पानेरी नदीत मिसळते. त्यामुळे सदर नदीचे नाल्यात रुपांतर झाले असून या पाण्याचा उपजिविकेसाठी वापर होत नाही. पानेरी नदीमध्ये हरणवाडी येथे वसंत बंधारा असून त्यातील साठलेले पाणी आजूबाजूच्या शेतीसाठी वापरले जाते. तसेच समुद्राच्या भरतीचे पाणी वडराई येथील बंधाऱ्यामध्ये पानेरी नदीतील गोडयापाण्यात मिसळण्यास अटकाव होतो. पानेरी नदी परिसरात स्थित एकूण ४३ उद्योगांमधून अंदाजे १.२ दशलक्ष लिटर प्रतिदिन सांडपाण्याची निर्मिती होत असून उद्योगांनी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणांची उभारणी केली आहे. प्रक्रियाकृत सांडपाण्याचा पुनर्वापर करणे अथवा बागकामासाठी वापरणे उद्योगांसाठी बंधनकारक आहे.

मुख्याधिकारी, पालघर नगरपरिषद यांच्या दि.११/१२/२०२५ रोजीच्या अहवालानुसार पालघर नगरपरिषदेची सद्यस्थितीत लोकसंख्या १.२५ लक्ष इतकी असून यासाठी ८.७५ दशलक्ष लिटर प्रतिदिन एवढा पाणी पुरवठा करण्यात येता. व तांत्रिक परिमाणांनुसार पालघर नगरपरिषद हद्दीमध्ये पाणी पुरवठ्याच्या ८० टक्के म्हणजेच ७.० दशलक्ष लिटर प्रतिदिन इतके सांडपाणी निर्माण होते. पालघर शहरात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी पालघर शहर भुयारी गटार योजनेचा प्रकल्प अहवाला तयार करणेकरिता मे.मेगाटेक कन्सल्टंट प्रा.लि. या तांत्रिक सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यात आली असून सदर संस्थेमार्फत अंदाजपत्रक तयार करण्याचे काम चालू आहे. तसेच स्वच्छ भारत मिशन २.० अंतर्गत पालघर पूर्व भागासाठी वेवुर गट नं.३४ (३०) येथे नवीन सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणेकामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला असून त्यास तांत्रिका मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर सविस्तर प्रकल्प अहवाल राज्य शासनाच्या विचाराधीन आहे.

पानेरी नदीच्या प्रदुषणासंबंधी दि.१६.०७.२०२५ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी यांची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दि.१६.०७.२०२५ रोजी पालघर माहिम पुलाजवळ पानेरी नदीच्या पाण्याचे नमुने गुणवत्ता तपासण्याकरिता संकलित करण्यात आले होते. नमुन्याचे पृथःकरण अहवालानुसार सर्व मानके विहीत मर्यादेत असल्याचे आढळून आले होते. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दि.१६.०७.२०२५ ते दि.१३.०८.२०२५ रोजीपर्यंत पानेरी नदी परिसरातील कारखान्यांची पाहणी करण्यात आली होती. सदर पाहणी दरम्यान दोषी आढळलेल्या दोन उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे निर्देश देण्यात आले असून संमतीपत्रातील अटी व शर्तींचे अनुपालन न करणाऱ्या एकूण नऊ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

**********

५

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन**
**लक्षवेधी सूचना क्रमांक ७६०**

श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.७६० खालील प्रमाणे आहे :-

"सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांच्याकडून मनमानी कारभार सुरू असणे, शासन निर्णय व मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली असणाऱ्या सचिव समितीचे निर्णय परस्पर बदलणे सारखी संस्थेला २० मजली इमारत बांधण्याचा प्रस्ताव सचिव समितीने मंजूर केलेला असताना परस्पर टेंडर मध्ये बदल करणे, शासन निर्णय दि. १३ डिसेंबर, २०२२ व ८ नोव्हेंबर, २०२३ चा भंग करण्याबाबत, लोकप्रतिनिधींनी आक्षेप घेतलेला असताना त्याकडे दुर्लक्ष करून मनमानी कारभार करणे, टेंडर पक्रियेत असणारी अनियमिता तसेच नाशिक जिल्हा न्यायालयासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत काढण्यात आलेल्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झालेला असल्याची तक्रार असणे, नाशिक जिल्ह्यात अनेक सक्षम शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंते कार्यरत असताना सदर प्रकल्पाचा चार्ज नगर जिल्ह्यातीलत राहुरी येथे कार्यरत कनिष्ठ अभियंत्याकडे सोपविण्यात येणे, अधिकाऱ्याचे ठेकेदाराशी संगनमत असणे, अनेक नामांकित व दर्जेदार फर्निचर उत्पादक कंपन्या असताना केवळ Godrej, Bacchubhai Chairs, Lunawat, Intro Furniture या मर्यादित चार कंपन्यांनाच टेंडर मध्ये भाग घेण्याचा अधिकार देणे, उच्चअधिकार समिती यांच्या मान्यतेने २८ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता आदेश आलेले असतांना कामाचे तुकडे करून टेंडर प्रक्रिया करण्यात येणे या सर्व अनिमिततेला वरिष्ठ अधिकाऱ्यांचे असणारे पाठबळ, त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागात वाढत असणारे भ्रष्टाचाराचे व मनमानी कारभाराचे प्रमाण, या गंभीर बाबींकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

---

**मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन**

नाशिक येथील सारथी संस्थेच्या इमारतीच्या बांधकामासाठी उपलब्ध असलेले जागेनुसार व सारथी संस्थेस आवश्यक असलेल्या क्षेत्रफळानुसार इमारत प्रस्तावित करण्यात आलेली होती. त्यानंतर अतिरिक्त जागा उपलब्ध झाल्याने व शासनाचे दिनांक १०/१०/२०२३ च्या पत्रानुसार कोल्हापुर येथील सारथी संस्थेच्या इमारतीप्रमाणे नकाशे व आराखडे तयार करावे, असे निर्देश प्राप्त झाल्याने त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. सबब प्रस्तुत प्रकरणी सक्षम स्तरावरुन मान्यता प्राप्त झालेली असल्याने मुख्य अभियंता, सा.बां.प्रा.विभाग, पुणे यांनी छाननी करुन त्यांच्या पत्र दि.०५.१२.२०२३ अन्वये मंजुरी

प्रदान केलेली असल्याने उचित कार्यवाही करण्यात आलेली आहे. निविदेस सक्षम स्तरावरुन मान्यता घेऊन कार्यारंभ आदेश संबधित कंत्राटदारास प्रदान केले आहेत.

जिल्हा न्यायालयाच्या कामासाठी विभागामार्फत वृत्तपत्रात जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करुन ई निविदा बोलाविल्या होत्या. प्राप्त झालेल्या निविदांची तपासणी अंती व अपात्र कंत्राटदारांना पुरेशी संधी देऊन जे कंत्राटदार पात्र ठरत होते त्यांचा आर्थिक लिफाफा उघडून निविदा स्विकृतीचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यांत आलेला होता. सक्षम स्तरावरुन सदर निविदा स्विकृती प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाल्यानंतरच संबधीत कंत्राटदार यांना या कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यांत आलेले आहेत.

नाशिक येथे नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे हे काम उपभोक्ता ( न्याय व विधी) विभागाच्या पाठपुरावा व दि १५ सप्टेंबर २०२५ पुर्वी इमारतीचे काम पुर्ण करुन इमारत उद्घाटन व वापरासाठी सुसज्ज करणे या कामाची तातडी लक्षात घेऊन सा. बां. उपविभाग राहुरी येथील कार्यरत असलेले कनिष्ठ अभियंता यांची मुख्य अभियंता सा. बां. प्रादेशिक विभाग नाशिक यांनी दि. ०८/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर कामाशी संबंधीत सा. बां. विभाग नाशिक येथील अधिकारी/ कर्मचारी यांना मा. न्यायालयातर्फे कौतुकपत्र (Expression of Gratitude and Appreciation) देऊन सन्मानित करण्यात आले आहे. सद्यस्थीतीत सदर न्यायालयीन इमारतीचा मा. न्यायालय यांचेकडुन सुरळीतपणे वापर सुरु आहे.

मा. न्यायालया कडून निश्चित केलेल्या बाबी ह्या विविध स्वरुपाच्या असुन त्या एकाच उद्योजकाकडून खरेदी करणे किंवा त्याची एकत्रित निविदा प्रक्रिया राबविणे शक्य नव्हते, तसेच या आवश्यक बाबीं व त्यांचे दर राज्यदरसुची मध्ये समाविष्ट नव्हते याकरीता या राज्यदरसुची बाह्य बाबींसाठी स्वतंत्र निविदा बोलाविणे क्रमप्राप्त होते व यामध्ये कालापव्यय होण्याची देखिल शक्यता होती. ही बाब दि. **२१.०६.२०२५** रोजीच्या बैठकीत उपस्थित मा. न्यायाधिश, सर्व अधिकारी व मुख्य अभियंता, सा बां प्रादेशिक विभाग नाशिक यांचे निदर्शनास आणल्यावर यावर पर्याय म्हणून या बैठकीत मा. न्यायालयाकडून दिलेल्या **Multiple agencies shall be appointed if required to ensure timely execution** याबाबीस सर्वांकडून सहमती देण्यांत आली. त्यानुसार या बाबींसाठी **Godrej, Bacchubhai Chairs, Lunawat, Intro Furniture** या उदयोजकांनीच फक्त सहभाग नोंदविलेला नसुन देशभरातून इतर ब-याच उदयोजकांनी सहभाग नोंदविला होता. प्राप्त निविदांची पडताळणी समिती मार्फत छाननी करुन अपुर्ण बाबींची पुर्तता करणेसाठी अपात्र ठरत असलेल्या उदयोजकांना पात्र होणेसाठी पुरेशी संधी देण्यांत आली. अंतिमरित्या पात्र ठरणाऱ्या उदयोजकांचा आर्थिक देकार उघडण्यांत येऊन सर्वात कमी दर असलेल्या उदयोजकांना **GeMs** प्रणालीव्दारे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यांत आले.

नाशिक येथे नविन जिल्हा न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे करीता रु. १७१,१७,००,०००/- इतक्या किंमतीस मुळ प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यांत आलेली होती. निविदा प्रक्रिया राबविण्यांत येवून शासनाचे मंजुरी अंती याकामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यांत आलेले होते. तद्नंतर शासन निर्णय क्रं.२अन्वये रु. ३१०,०२,६६,०००/- इतक्या किंमती साठी दि. १९.०६.२०२५ रोजी सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रदान केलेली होती. उर्वरित काम करण्याचे प्रस्तावास शासन

पत्र दि. २५/०७/२०२५ अन्वये मान्यता देण्यात आली. यात, अतिरिक्त काम (स्थापत्य व विद्युत दोन्ही वस्तु व सेवा करासह) अस्तित्वातील कंत्राटदाराकडुन करण्यास, फर्निचरची स्वतंत्र निविदा प्रक्रिया करण्यास मान्यता देण्यात आली. वरील प्रक्रिया मा. सर न्यायाधीश (भारत) यांचे हस्ते होणारे इमारतीचे नियोजित उद्घाटन लक्षात घेता मा. उच्च न्यायालयाचे न्यायमुर्तीनी घेतलेल्या विविध बैठकांमध्ये प्राप्त होणारे निर्देश लक्षात घेऊन संपूर्ण कार्यवाही करण्यात आली आहे.

मा. न्यायमुर्ती उच्च न्यायालय व इमारत सदस्य समिती यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने विषयांकित कामाबाबत पुढील कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यांत यावी." या सक्षम स्तरावरुन प्राप्त झालेल्या मंजुरीच्या अनुषंगाने कामाची निकड व गांभिर्य विचारात घेऊन काम विहीत मुदतीत पुर्ण होण्याच्या दृष्टीने सुप्रमा मधील घटक भागातील कामाची ५ भागांमध्ये विभागणी करुन त्यामध्ये वरील नमुद केल्या प्रमाणे पारदर्शकरित्या निविदा विषयक कार्यवाही पुर्ण करण्यांत आलेली होती. Fixed Furniture साठी प्रत्यक्षात जास्त कालावधी लागणार असल्याने Fixed Furniture बाबत निविदा प्रक्रीया राबविण्यांत आली व काम त्वरीत पुर्ण होण्याच्या दृष्टीने सदर निविदेस सक्षम स्तरावरुन मंजुरी प्राप्त झाल्यानंतर त्वरीत संबधीत कंत्राटदार यांना कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यांत आले.

Movable Furniture बाबी मा. न्यायाधीश उच्च न्यायालय तथा पालक न्यायाधीश नाशिक यांचेतर्फे अंतिम रित्या निश्चित करण्यांत आल्या होत्या. विविध दिनांकास मा. न्यायालया कडून निश्चित केलेल्या बाबी हया विविध स्वरुपाच्या असुन त्या एकाच उद्योजकाकडून खरेदी करणे किंवा त्याची एकत्रित निविदा प्रक्रिया राबविणे शक्य नाही व यामध्ये कालापव्यय होण्याची देखिल शक्यता होती. मा.न्यायालयाकडून दिलेल्या Multiple agencies shall be appointed if required to ensure timely execution या सुचनेस आधिन राहून वरील आवश्यक मा. न्यायालयाने निश्चित केलेल्या Moveble फर्निचरच्या बाबींची चार भागात विभागणी केल्यास विविध उदयोजकांकडून Moveble फर्निचरचा पुरवठा विहीत कालमर्यादेत होण्यासाठी सर्वात कमी दर असलेल्या उदयोजकांना GeMs प्रणालीव्दारे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यांत आले. व सद्यस्थीतीत सदर न्यायालयीन इमारतीचा मा. न्यायालय यांचेकडुन सुरळीतपणे वापर सुरु आहे.

------///-------

**श्री. महेंद्र दळवी, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक :- १४८७**

"अलिबाग रोहा कनघर वावे रस्त्याच्या कामाला दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी मान्यता मिळाली असणे, सदर कामासाठी सुमारे १७९ कोटी रुपयाची निविदा प्रक्रिया राबविण्यात येणे, सदर कामाचे निविदा मे. जे.आर.ए. अलिबाग रोड प्रोजेक्ट मर्या. कंपनीला देण्यात येणे, सदर ठेकेदाराने उक्त काम विहित वेळेत पूर्ण न करणे, सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्याकरिता १२ महिन्यांच्या कालावधीची मुदतवाढ घेतली असणे, सदर कामाचे आजपर्यंत ११ देयके आदा करण्यात आली असून सुमारे १४५ कोटी रुपये शासनाने ठेकेदारस दिले असणे, परंतु उर्वरित ५५ ते ६० कोटी रक्कम पाहता व प्रलंबित असलेल्या रस्त्याचे काम पाहता रक्कम तुटपूंजी असणे, जी ११ देयके शासनाने अदा केले आहेत त्या देयकांचा मोजमाप पुस्तिका (M.B) मध्ये कोणत्याही प्रकारची नोंद नसणे, सदर प्रलंबित कामामध्ये मोठ्या प्रमाणात ब्रिजेसची कामे प्रलंबित असणे, उक्त एकूण रस्त्यांपैकी ०० ते ५ किलोमिटरचा रस्ता MSRDC कडे वर्ग केला असणे, वरील परिस्थिती पाहता शासनाने ठेकेदारास अदा केलेली रक्कम झालेल्या कामापेक्षा अधिकची असल्याचे निदर्शनास येणे, प्रलंबित रस्त्याचे काम पूर्ण करण्याकरिता तसेच चुकीच्या पध्दतीने ठेकेदारस देयके अदा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर चौकशी करुन कारवाई करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन**

रायगड जिल्हयातील अलिबाग रोहा रस्त्याची सुधारणा करणे रा.मा. ९१ कि.मी. ०/००० ते ८५/६०० हे काम HAM (पॅकेज क्र. MU-L-०१) अंतर्गत मंजूर आहे. सदर कामासाठी JRA Infrastructure Limited., ला दिनांक १६/१२/२०१९ रोजी letter of award देण्यात आले आहे. सदर कामाची Appointed Date दि.२५/११/२०२१ रोजी देण्यात आलेली आहे. सदर कामाची स्विकृत निविदा रक्कम रु.१७७.७८ कोटी (जी.एस.टी. वगळून) इतकी आहे. काम पूर्ण करण्याचा कालावधी २३/११/२०२३ पर्यंत होता. त्यानंतर दि.२०/११/२०२४ पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच, दि.३०/०६/२०२६ पर्यंत द्वितीय मुदतवाढ प्रस्तावित करण्यात आलेली आहे. सदर कामासाठी आजपर्यंत सवलतकारास एकूण रु.१०९.२४ कोटी (माईलस्टोन, भाववाढ आणि जी.एस.टी. सह) रक्कम देण्यात आलेली आहे. कामाच्या निविदेच्या तरतुदीनुसार कामाचे Milestone ठरविण्यात आलेले आहेत व स्वतंत्र अभियंता यांनी Milestone पूर्ण झाल्याचे प्रमाणित केल्यानंतर सवलतकारास देयके अदा केली जातात. सदर कामासाठी Global Infra Solution यांची स्वतंत्र अभियंता म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. हॅम निविदेच्या तरतूदीनुसार आवश्यक नोंदी मोजमाप पुस्तकामध्ये घेण्यात आलेल्या आहेत. सदर कामास अद्यापपर्यंत स्वतंत्र अभियंता यांनी ३ Milestone (५०% काम) पूर्ण झाल्याचे प्रमाणित केले आहे. उर्वरित कामांमध्ये रस्ते मजबुतीकरणासह २० लहान पुलांचे पुर्नबांधणी करणेचे काम प्रलंबित आहे. सदरचे काम पूर्ण करणेबाबत सवलतकारास वारंवार सुचना देण्यात आल्या. परंतू तिसऱ्या माईलस्टोन मधील भाववाढ व GST चे देयक प्रलंबित असल्यामुळे सवलतकार संथ गतीने काम करीत होता. माहे डिसेंबर-२०२५ मध्ये प्रलंबित निधी उपलब्ध झाल्यानंतर उर्वरित पुलांपैकी अत्यावश्यक कमकुवत पुलांचे पुर्नबांधणीचे काम सवलतकाराने हाती घेतले आहे. धोकादायक पुलांचे पुर्नबांधणीचे काम मे-२०२६ अखेर पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या रस्त्याच्या एकूण लांबी पैकी प्र.रा.मा.४ मध्ये कि.मी. ०/७२५ ते कि.मी. ६/००० एकूण ५.२७५ कि.मी. लांबी MSIDC (महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ मर्या.) यांचेकडे हस्तांतरित करण्यात आलेली

आहे. एकूण प्रकल्प किंमत १७७.७८ कोटी (GST वगळून) असून आता पर्यंत ५०% काम पूर्ण झाले असल्यामुळे प्रत्यक्ष कामावर ६८.४५ कोटी इतकी रक्कम खर्च झाली आहे. उर्वरित रक्कम भाववाढ व GST यामध्ये अंतर्भूत करण्यात आली आहे. रस्त्याच्या एकूण लांबी पैकी प्र.रा.मा.४ मध्ये कि.मी. ०/७२५ ते कि.मी. ६/००० एकूण ५.२७५ कि.मी. लांबी MSIDC (महाराष्ट्र राज्य पायाभुत सुविधा विकास महामंडळ मर्या.) यांचेकडे हस्तांतरित करण्यात आलेली आहे. परंतू त्यांच्या निविदेतील अंतर्भूत कामाचा वाव विभागीय कार्यालयाला दि.१३/११/२०२५ रोजी प्राप्त झाला आहे, त्यामुळे विषयांकित कामाचे व्याप्तीतून नमूद लांबीतील वाव वगळण्याची (De-scope) कार्यवाही प्रगतीत आहे.

MSIDC ला हस्तांतरित करण्यात आलेल्या लांबीवर अद्याप कोणतेही काम करण्यात आलेले नाही तसेच त्याकरिता कोणतेही देयक अदा करण्यात आलेले नाही.

सदरची हस्तांतरित लांबी वगळल्यानंतर (De-scope करून) Schedule G नव्याने करून प्रकल्पाची सुधारित किंमत कमी होईल.

या लांबीतील पूल व रस्त्याचे काम विषयांकित कामामधून वगळण्याचा प्रस्ताव (De-scope) वरिष्ठ कार्यालयास स्वतंत्रपणे सादर करण्याची प्रक्रिया चालू आहे.

**********

प्राथम्य क्र. १३
लक्षवेधी सूचना क्र.१३७२

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

श्री. संजय उपाध्याय, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१३७२ पुढीलप्रमाणे आहे:-

"महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट्स आणि गाईड्स ही संस्था "The Bharat Scouts and Guides, New Delhi" या राष्ट्रीय संस्थेची राज्य शाखा असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी कार्यरत असणे, ही संस्था १००% शासन अनुदानित असल्याने तिचे सर्व आर्थिक व प्रशासकीय कामकाज शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत चालणे, सन २००५ ते २०१८ दरम्यान निवडणुकीद्वारे कार्यकारिणीत आलेल्या काही खाजगी पदाधिकाऱ्यांच्या कारभारात गंभीर आर्थिक अनियमितता, कर्मचाऱ्यांवरील अन्याय, भ्रष्टाचार व गैरव्यवहाराच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त होणे, शासन चौकशीत या तक्रारी सत्य ठरल्याने दि.०९.०८.२०१९ रोजी शासनाने संपूर्ण कार्यकारिणी बरखास्त करून प्रशासक मंडळ नियुक्त करणे, यानंतर संस्थेचा कारभार शासन नियंत्रणाखाली पारदर्शक व शिस्तबद्ध पद्धतीने सुरू असणे, दि.१५ जुलै २०२५ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्यात येणे, राज्य व जिल्हा संस्थांवर खाजगी व्यक्तींची निवडणुकीद्वारे नियुक्ती करण्यास पूर्णतः प्रतिबंध करणे, शासन निर्णय दि. ०९.०८.२०१९, २७.१२.२०१९, १८.१२.२०२० आणि १२.०८.२०२१ तसेच राष्ट्रीय नियमावलीनुसार शासन नियुक्तीची विद्यमान पद्धत कायम ठेवावी, संस्थेचे अध्यक्ष म्हणून मा. क्रीडा व युवक सेवा मंत्री यांची नियुक्ती कायम ठेवावी, मा.मुख्यमंत्री यांनी दि. २७.०६.२०२५ व ११.११.२०२५ रोजी स्पष्ट निर्देश देऊन शासन निर्णय कायम ठेवण्याचा व निवडणुका रद्द करण्याचा आदेश दिला असताना, क्रीडा व युवक सेवा विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी आजपर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, उलट काही खाजगी व्यक्तींच्या बैठका लावून व दिशाभूल करणारी माहिती देऊन मा. क्रीडा मंत्री यांना चुकीचे मार्गदर्शन करण्यात आले असल्याचे निदर्शनास येणे, मा. मुख्यमंत्र्यांच्या आदेशांकडे दुर्लक्ष केल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर हक्कभंगाची कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

**********

## मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांचे निवेदन

सन २०१९ पूर्वी महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस् संस्थेवर निवडणूकीने पदाधिकाऱ्यांची निवड होत असे. संस्थेच्या राज्य व जिल्हा स्तरावरील पदाधिकाऱ्यांनी मोठया प्रमाणात प्रशासकीय व आर्थिक अनियमितता केल्याचे शासनाच्या निदर्शनास आले.शासनाने सन २०१७ मध्ये चौकशी समिती गठीत करुन संस्थेची चौकशी करण्यात आली. सदर चौकशी दरम्यान खाजगी पदाधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे शासनाकडून देण्यात आलेल्या निधीचा गैरवापर तसेच संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या बदल्या, भरती व पदोन्नतीतील अनियमितता, आर्थिक व्यवहारातील अनियमितता व गैरप्रकार, कर्मचाऱ्यांकडून पैसे वसुली करणे अशा गंभीर बाबी चौकशी अंती निदर्शनास आल्या आहेत. या कारणास्तव महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस् या संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली. परंतु प्रशासक मंडळामध्ये शासकीय अधिकारी यांच्या सोबत खाजगी पदाधिकारी यांची नियुक्ती केल्यामुळे शासकीय अधिकाऱ्यांना नियमानुसार कार्यवाही करण्यास अडचणी निर्माण होत होत्या. त्यामुळे सदर प्रशासक मंडळ डिसेंबर २०१९ मध्ये बरखास्त करण्यात येवून दिनांक २७/१२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस् राज्य संस्थेचे कार्य सुरळीतपणे व कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी राज्य मुख्य आयुक्त म्हणून आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची नियुक्ती करण्यात आली.

शासन निर्णय दि. ०८.०२.२०२१ अन्वये महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस् या संस्थेच्या जिल्हा यंत्रणा अधिक क्षमतेने काम करण्यासाठी जिल्हा स्तरावर i) जिल्हा आयुक्त (स्काऊट) म्हणून संबंधित जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी (माध्यमिक), ii) जिल्हा आयुक्त (गाईड) म्हणून संबंधित जिल्हा परिषदेतील महिला अधिकारी (उप शिक्षणाधिकारी स्तरावरील) व iii) जिल्हा चिटणीस म्हणून संबंधित जिल्हा परिषदेतील उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली आहे. दिनांक २३/०७/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस् या संस्थेचे अध्यक्ष म्हणून मा. मंत्री, क्रीडा व युवक कल्याण, महाराष्ट्र राज्य यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट गाईड संस्थेची निवडणूक घेण्यासंदर्भात मा. उपमुख्यमंत्री, वित्त व नियोजन यांच्या अध्यक्षतेखाली दि. २९.०४.२०२५ रोजी बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी चार सदस्यीय तदर्थ समिती नियुक्ती करण्याबाबत निदेश दिले होते. त्यानुसार शासन आदेश दिनांक २०.०६.२०२५ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे. यासंदर्भात श्री. सुशिल राजेंद्र सिंह यांनी, पूर्व मुंबई उपनगर संस्थेच्या वतीने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. १८३४६/२०२५ दाखल आहे.

दरम्यान मा.विधानसभा सदस्य यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे दि. २१.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये गठीत समितीमध्ये फौजदारी गुन्हा असलेल्या एका सदस्याचा समावेश असल्याने व स्काऊट चळवळीत सक्रीय सदस्य नसल्याने समिती बरखास्त करण्याची तसेच मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) व आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिपत्याखाली काम उत्तमरित्या सुरु असल्याने तदर्थ समिती गठीत करण्याची आवश्यकता नसल्याने निवेदन दिले होते. सदर निवेदन विभागाकडून दि.१०.०६.२०२५ रोजी तत्का.मा.मंत्री यांच्या अवलोकनार्थ तथा आदेशार्थ सादर करण्यात आले होते.

तद्नंतर मा. विधानसभा सदस्य यांनी दि.२७.०६.२०२५ च्या पत्रान्वये, मा. उपमुख्यमंत्री, वित्त व नियोजन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दि. २९.०४.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त रद्द करण्याबाबत व त्या आधारे गठीत समिती रद्द करण्याबाबत विनंती केली. सदर पत्रावर मा. मुख्यमंत्री महोदयांनी "प्रधान सचिव क्रीडा यांनी कार्यवाही करावी" असे निर्देश दिलेले आहेत. निवेदनातील विनंती व त्यावरील मा. मुख्यमंत्री महोदयांचे निर्देश विभागाने तत्का. मा. मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांच्याकडे दि. ०७.०७.२०२५ रोजी अवलोकनार्थ सादर केले होते.

याच प्रकरणी मा. विधानसभा सदस्य यांनीविद्यमान मा.मंत्री क्रीडा यांच्या कडे दि.०६.०८.२०२५ रोजी दिलेल्या पत्रातील विनंतीच्या अनुषंगाने विभागाने प्रकरण दि.१६.०९.२०२५ रोजी मा.मंत्री (क्रीडा) यांच्याकडे सादर करण्यात आले. यासंदर्भात मा. मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांच्याकडे दि. १५.१०.२०२५ रोजी बैठक झाली. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदयांची मंजुरी प्राप्त करण्यात आली आहे.

दरम्यान मा. विधानसभा सदस्य यांनी उपरोक्त दि.२१.०५.२०२५, दि. २७.०६.२०२५ व दि. ०६.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये दिलेली निवेदने व त्या अनुषंगाने विभागाने वेळोवेळी केलेली कार्यवाही विभागाकडून दि. १४.१०.२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अवलोकनार्थ व आदेशार्थ सादर करण्यात आली. त्यास मा.मुख्यमंत्री महोदयांची मान्यता झाली आहे.

**********

# लक्षवेधी सूचना क्र.३८८

तृतीय-द्विवाळी

सन २०२५ चे अर्थसंकल्पित अधिवेशन

श्रीमती.नमिता मुंदडा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम- १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"बीड जिल्ह्यात संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी वृध्दापकाळ योजना, या तीन योजनेअंतर्गत निराधार, वयोवृद्ध नागरिकांना मानधन दिले जात असणे, परंतु शासनाने थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रणाली लागू केल्याने व सदर प्रणालीत तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने सदर मानधन मागील आठ ते नऊ महिन्यापासून रखडले असल्याने वृद्ध, निराधार तहसील कार्यालयाच्या चकरा मारून त्रस्त असून त्यांच्यामधून तीव्र रोष व्यक्त करण्यात येत असणे, सदर तिन्ही योजनेचे लाभार्थी हे वयोवृद्ध, निराधार आहेत सदर योजनेतून मिळणाऱ्या मानधनातून त्यांचा उदरनिर्वाह चालतो मानधन न मिळाल्याने सदर लाभार्थी आर्थिक अडचणीत सापडले असून त्यांच्या खाण्यापिण्यासह औषधींचा मोठा प्रश्न निर्माण झाला असणे, त्यामुळे थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रणाली त्वरित सुरळीत करून वरील योजनेतील लाभार्थ्यांचे प्रलंबित मानधन त्यांना तातडीने अदा करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

मा. मंत्री, विशेष सहाय्य यांचे निवेदन :-

विशेष सहाय्य कार्यक्रमातंर्गत राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना आणि केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना या योजना राज्यात राबविण्यात येतात.या योजनेंतर्गत वृद्ध, विधवा, निराधार पुरुष-महिला, दिव्यांगाची सर्व प्रवर्ग, दुर्धर आजाराने ग्रस्त व्यक्ती, तृतीयपंथी, १८ वर्षाखालील अनाथ मुले-मुली इत्यादी प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांना दरमहा रु.१५००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येते.

विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना माहे डिसेंबर, २०२४ पासून अर्थसहाय्याचे वितरण डी.बी.टी पोर्टलद्वारे करण्यात येत आहे. तसेच माहे जानेवारी, २०२५ पासून Aadhar Validate झालेल्या लाभार्थ्यांनाच डी.बी.टी. पोर्टलद्वारे अर्थसहाय्य वितरीत करण्यात येत आहे. या योजनेतील लाभार्थी लाभापासून वंचित राहू नयेत तसेच लाभार्थ्यांना वेळेवर अर्थसहाय्य मिळावे, याकरिता सर्व जिल्हाधिकारी यांना DBT पोर्टलवर प्रलंबित असलेल्या लाभार्थ्यांची माहिती भरण्याची कार्यवाही युध्दपातळीवर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच लाभार्थ्यांचे Aadhar अद्ययावत करण्याबाबत जिल्हा/ तालुका/ मंडळस्तरावर विशेष मोहिम राबवून लाभार्थ्यांचे आधार १०० टक्के अद्ययावत करण्याबाबत वेळोवेळी शासन स्तरावरुन व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सूचना देण्यात आलेल्या आहेत.

दि. १५ सप्टेंबर,२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजनेतील पात्र दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात रु.१५००/- वरुन रु.२५०० इतकी वाढ करण्यात आलेली असून, सदर वाढ माहे ऑक्टोबर,२०२५ पासून देण्यात येत आहे.

राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना आणि केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना या योजनेंतर्गत माहे जानेवारी, २०२५ पासून डीबीटी पोर्टल वरील On Board (ऑन बोर्ड) झालेल्या Aadhar Validate लाभार्थ्यांनाच सदर योजनांचा लाभ देण्यात येतो.

त्यानुषंगाने राज्य पुरस्कृत योजनेतील पात्र एकूण ३५,८९,००७ (पस्तीस लाख एकोणनव्वद हजार सात) लाभार्थ्यांना तसेच केंद्र पुरस्कृत योजनेतील पात्र एकूण १०,४६,९६८(दहा लाख शेहेचाळीस हजार नऊशे अडुसष्ट) लाभार्थ्यांना अशा एकूण ४६,३५,९७५ (शेहेचाळीस लाख पस्तीस हजार नऊशे पंच्याहत्तर) इतक्या पात्र लाभार्थ्यांना माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये अर्थसहाय्य त्यांचे आधार संलग्न असलेल्या बँक खात्यात जमा करण्यात आलेले आहे. त्यामधील बीड जिल्ह्यात राज्य पुरस्कृत योजनेचे एकूण २,०२,७२६ (दोन लाख दोन हजार सातशे सव्वीस) लाभार्थी तर केंद्र पुरस्कृत योजनेचे एकूण १५,३५० (पंधरा हजार तीनशे पन्नास) लाभार्थी अशा एकूण २,१८,०७६ (दोन लाख अठरा हजार शहात्तर) इतक्या लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे.

**********

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सुचना क्र.१४२६**

श्री. राजकुमार बडोले, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १४२६ पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यातील अनु.जाती व नवबौध्द समाजाचे ७० टक्के लोक भुमीहीन असुन त्यांची संख्या जवळपास ३० लाख असणे, या भुमीहीन कुटूंबापैकी आतपर्यंत अंदाजे ५००० कुटूंबांना ५००० हेक्टर जमीनीचे वाटप कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण योजनेत करणे,उर्वरीत भुमीहीन कुटूंबासाठी विशेष घटक योजनेअंतर्गत कोणताही लाभ न मिळणे,या भुमीहीन कुटूंबातील युवकांना महामंडळामार्फत स्वयंरोजगार न मिळणे व सरकारने कोणत्याही योजना न करणे,राज्यातील १०० अनु.जाती विद्यार्थ्यांना देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहु महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना २००९ पासून सुरु होऊन त्यात कोणतीही सुधारणा न होणे,सैनिक शाळेतील अनु.जातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता योजना २००३ पासून कोणतीही सुधारणा न होता वार्षिक १५००/-प्रतीवर्ष अनुदान मिळणे, राजश्री शाहु महाराज गुणवत्ता पुरस्काराची अंमलबजावणी न होणे व त्यात सुधारणा न होणे, १९७५ मध्ये सुरु झालेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अनु.जाती विद्यार्थ्यांना दरमहा फक्त १०० रु. विद्यावेतन देण्यात येणे, या सगळ्या योजनांचे पुनर्विलोकन होऊन विद्यावेतन भत्ते यात सुधारणा करणे,सगळे अनु.जाती व नवबौंध्द महामंडळांचे कर्ज वाटप ठप्प होणे व फक्त कागदोपत्री तरतूद दाखविली जाणे, आंतरजातीय विवाह योजनेतील जोडप्यांना तीन-तीन वर्षे निधी न मिळणे, त्यासाठी सरकार प्रोत्साहन न देणे, बेरोजगार युवकांसाठी रोजगार देणे व कर्ज देऊन त्यांना स्वावलंबीकरण करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."

## मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांचे निवेदन

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना सन २००४-०५ पासून राबविण्यात येत आहे. सदर योजनेतंर्गत दारिद्र्य रेषेतील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील भूमिहीन शेतमजूरांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ होणेसाठी या योजनेमध्ये बदल करण्यात येऊन शासन निर्णय, दि.१४ ऑगस्ट, २०१८ प्रमाणे ही योजना ५०% कर्ज व ५०% अनुदान या ऐवजी १००% अनुदानावर राबविण्यात येत आहे. या योजनेकरीता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता रू.१००.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे. सन २००४ पासून ते २०२५ पर्यंत एकुण ६९१६ अनुसूचित जातीच्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना जमिन वाटप करण्यात आलेली असून अद्यापही काही जिल्हयामध्ये जमिन वाटपाची कार्यवाही सुरू आहे . सबब, या योजनेकरीता भुमीहीन कुटूंबापैकी आतपर्यंत अंदाजे ५००० कुटूंबांना ५००० हेक्टर जमीनीचे वाटप कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण योजनेत करणे, उर्वरित भुमीहीन कुटूंबासाठी विशेष घटक योजनेअंतर्गत लाभ देण्यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे.

विभागांतर्गत कार्यरत सर्व महामंडळांचे कामकाज सुरळीत चालू असून महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात रू.२८.०३ कोटी व चालू

आर्थिक वर्षात आतापर्यंत रू. २९.४६ कोटी, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात रू.१६.३८ कोटी ,तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात आतापर्यंत रू.२३.८९ कोटी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात रू.९.२० कोटी व सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात आतापर्यंत ९.८७ कोटी एवढा कर्ज निधी विविध योजनांतर्गत पात्र लाभार्थ्यांना वाटप केला आहे.

राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, सन २००३ पासून सुरु करण्यात आलेल्या या योजनेचा उद्देश अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांतील १०० गुणवंत विद्यार्थ्यांना देशातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये (IIT, IIM, IISER इ.) मोफत उच्च शिक्षण मिळावा असा आहे. सदर योजना सुरळीत सुरू असून विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ मिळत आहे.

सैनिकी शाळेत प्रशिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता योजना सन २००३ पासून सुरु करण्यात आली असून याव्दारे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA) मध्ये प्रवेश मिळण्यास प्रोत्साहन देणे आणि त्यांच्यात शिस्त, आत्मविश्वास, नेतृत्व तसेच देशभक्ती यांसारख्या गुणांची जोपासना करणे असा आहे. सदर योजनेंतर्गत राज्यात ४ सैनिक शाळा नाशिक, पुणे, सातारा व चंद्रपूर येथे सुरू आहेत. या अंतर्गत सैनिकी शाळेत प्रवेशित SC विद्यार्थ्यांना संपूर्ण खर्च (शिक्षण, भोजन, निवास, कपडे, घोडेस्वारी, पॉकेट मनी) शासनाकडून दिला जातो. या शाळेतील प्रवेशित SC विद्यार्थ्यांची वार्षिक शिष्यवृत्ती ₹ १५,००० वरून ₹ ५०,०००/- पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे..

राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार योजनेंतर्गत इयत्ता १० वी १२ वी च्या परिक्षेत विशेष उल्लेखनिय यश मिळविणाऱ्या अनु. जातीच्या मुला-मुलींना राजर्षि छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार योजना सन २००३ पासून राबविण्यात येत आहे. याव्दारे विशेष गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना रोख रक्कम देण्यात येते.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांना विद्यावेतन ही योजना अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण देऊन व्यावसायिक संधी उपलब्ध करण्यासाठी सन १९८३ पासून सुरू झाली आहे. सन २०२३ पासून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (ITI) शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रवेश घेतलेल्या सर्व प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा ₹ ५००/- इतके सुधारित दराने विद्यावेतन देण्यात येत आहे.

आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर अर्थसहाय्य देण्याच्या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत पती-पत्नीच्या संयुक्त खात्यामध्ये पीएफएमएस प्रणालीद्वारे रु. ५०,०००/- अर्थसहाय्य देण्यात येते. सदर योजनेंतर्गत सन २०२३-२४ ते २०२५-२६ या तीन वर्षाच्या कालावधीत आतापर्यंत रू.७५.४६ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून १५०९२ जोडप्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आला आहे. सद्यस्थितीत निधीअभावी राज्यात एकही लाभार्थी लाभापासून वंचित राहिलेला नाही.

*****

# लक्षवेधी सूचना क्र.१५६१

## सन २०२५ चे तृतीय द्वितीय अधिवेशन

श्री.विठ्ठल लंघे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम- १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्य व केंद्र शासनाच्या पुरस्कृत वृद्ध, विधवा व निराधार अनुदान योजना कार्यरत असून यापूर्वी लाभार्थ्यांना अनुदान थेट चेकद्वारे दिले जाणे, मात्र नंतर डी.बी.टी. प्रणाली लागू केल्याने बहुतांशी लाभार्थी पोर्टलवर नोंदणीकृत नसल्यामुळे अनुदानापासून वंचित राहणे, यामध्ये विशेषत: वृद्ध आणि अपंग लाभार्थ्यांना केवायसी प्रक्रियेसाठी आधारावर ठसे न येणे, आधार अपूर्ण असणे किंवा मोबाईल नंबर लिंक नसणे यासारख्या कारणांमुळे लाभ घेता न येणे, त्यामुळे डिसेंबर, २०२४ पासून अनेक लाभार्थ्यांना अनुदान प्राप्त होत नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीसह जीवनमानावर गंभीर परिणाम होणे, यावर शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने तातडीने उपाययोजना करून लाभार्थ्यांना तातडीने वृद्ध व अपंग लाभार्थ्यांना केवायसी प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, यावर याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

### मा. मंत्री, विशेष सहाय्य यांचे निवेदन :-

विशेष सहाय्य कार्यक्रमातंर्गत राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना आणि केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना या योजना राज्यात राबविण्यात येतात.या योजनेंतर्गत वृद्ध, विधवा, निराधार पुरुष-महिला, दिव्यांगाची सर्व प्रवर्ग, दुर्धर आजाराने ग्रस्त व्यक्ती, तृतीयपंथी, १८ वर्षाखालील अनाथ मुले-मुली इत्यादी प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांना दरमहा रु.१५००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येते.

विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना माहे डिसेंबर, २०२४ पासून अर्थसहाय्याचे वितरण डी.बी.टी पोर्टलद्वारे करण्यात येत आहे. तसेच माहे जानेवारी, २०२५ पासून Aadhar Validate झालेल्या लाभार्थ्यांनाच डी.बी.टी. पोर्टलद्वारे अर्थसहाय्य वितरीत करण्यात येत आहे. सदर योजनेतील ज्या लाभार्थ्यांचे आधार प्रमाणिकरण झालेले नाही, आधार बँकेशी लिंक झालेले नाही तसेच आधार अद्ययावत नाही अशा विविध कारणास्तव काही लाभार्थ्यांना अर्थसहाय्य मिळाले नाही हे खरे आहे. परंतु लाभार्थी लाभापासून वंचित राहू नयेत, लाभार्थ्यांना वेळेवर अर्थसहाय्य मिळावे, याकरिता सर्व जिल्हाधिकारी यांना DBT पोर्टलवर प्रलंबित असलेल्या लाभार्थ्यांची माहिती भरण्याची कार्यवाही युध्दपातळीवर करुन लाभार्थ्यांचे Aadhar अद्ययावत करण्याबाबत जिल्हा /तालुका/ मंडळस्तरावर विशेष मोहिम राबवून लाभार्थ्यांचे आधार १०० टक्के अद्ययावत करण्याबाबत वेळोवेळी शासन स्तरावरुन पत्राद्वारे तसेच व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सूचना देण्यात आलेल्या आहेत.

दि. १५ सप्टेंबर,२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजनेतील पात्र दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात रु.१५००/- वरुन रु.२५०० इतकी वाढ करण्यात आलेली असून, सदर वाढ माहे ऑक्टोबर,२०२५ पासून देण्यात येत आहे.

राज्यातील राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना आणि केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना या योजनेंतर्गत माहे जानेवारी, २०२५ पासून डीबीटी पोर्टल वरील On Board (ऑन बोर्ड) झालेल्या Aadhar Validate लाभार्थ्यांनाच लाभ देण्यात.येत आहे.

त्यानुषंगाने राज्य पुरस्कृत योजनेतील पात्र एकूण ३५,८९,००७ (पस्तीस लाख एकोणनव्वद हजार सात) लाभार्थ्यांना तसेच केंद्र पुरस्कृत योजनेतील पात्र एकूण १०,४६,९६८(दहा लाख शेहेचाळीस हजार नऊशे अडुसष्ट) लाभार्थ्यांना अशा एकूण ४६,३५,९७५ (शेहेचाळीस लाख पस्तीस हजार नऊशे पंच्याहत्तर) इतक्या पात्र लाभार्थ्यांना माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये अर्थसहाय्य त्यांचे आधार संलग्न असलेल्या बँक खात्यात जमा करण्यात आलेले आहे.

**********

गृह (परिवहन)विभाग
लक्षवेधी सूचना क्र.२००

महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

माननीय श्री.सुनिल प्रभू, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०० पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मीनस रेल्वे स्थानकात सेंट्रल रेल्वे मजदूर संघाने दिनांक ७ नोव्हेंबर, २०२५रोजी सांय. ४.०० वा. अचानक ठिय्या आंदोलन करुन लाखो प्रवाशांना वेठीस धरण्याची घटना घडणे, या आंदोलनानंतर रेल्वे ठप्प असल्याने रुळावरुन चालत जाणाऱ्या २ प्रवाशांना लोकलने धडक दिल्याने मृत्युमुखी पडण्याची घटना घडणे, ठाणे रेल्वे पोलीसांनी मुंब्रा दुर्घटना प्रकरणी अभियांत्रिकी विभागाच्या अधिकाऱ्यांना चुकीच्या पध्दतीने दोषी ठरवून आरोपी केल्याच्या निषेधार्थ रेल्वे मजदूर संघाकडून आंदोलन करण्यात येणे, तसेच मोटरमॅन व्यवस्थापकाच्या दालनाबाहेर हे आंदोलन करण्याची परवानगी नसतानाही आंदोलन केल्याची माहिती रेल्वे पोलीसांनी दिलेल्या अहवालाद्वारे निदर्शनास येणे, सदरहू प्रकरणी महाव्यवस्थापक, विभागीय व्यवस्थापकांनी जबाबदारी स्वीकारुन राजीनामा द्यावा आणि अत्यावश्यक सेवा कायद्यानुसार गुन्हा नोंदविण्याची माहिती लोकप्रतिनिधींनी केंद्रीय रेल्वे मंत्र्यांना दिलेल्या पत्राद्वारे मागणी करण्यात येणे, ऐन गर्दीच्या वेळेत आंदोलन केले व त्यानंतर अपघात घडल्यामुळे प्रवासी संघटनेने अनेकवेळा भेटण्याचा प्रयत्न करुनही त्यांनी भेट नाकारणे, दररोजच्या रेल्वेच्या असुविधेमुळे प्रवाशांची झालेली प्रंचड गैरसोय यामुळे जनतेत निर्माण झालेले तीव्र संतापाचे वातावरण, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष. याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

मा. मंत्री (परिवहन) यांचे निवेदन

मुंब्रा रेल्वे स्थानक येथे दिनांक ०९/०६/२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मीनस ते कर्जत व कसारा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मीनस या लोकल गाडया एकमेकांजवळून पास होताना जवळ आल्याने, दोन्ही गाडयांतून फुटबोर्डवरुन प्रवास करणारे प्रवाशी एकमेकांना धडकल्याने अपघात झाला



(ROTA)/H-841(50-10-2025)

व दोन्ही लोकल गाडयांतून प्रवास करणारे प्रवाशी खाली पडून ५ मयत व ९ प्रवाशी जखमी झाले होते. त्यावरुन ठाणे रेल्वे पोलीस ठाण्यात अपमृत्यू प्रकणांची नोंद होऊन चौकशी अंती रेल्वे विभागातील दोषी इंजिनीअर यांचेविरुध्द ठाणे रेल्वे पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.११३३/२०२५ कलम १०५, १२५ अ, १२५ब, ३(५) बीएनएस अन्वये दिनांक ०१/११/२०२५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला.

त्यामुळे, चुकीच्या पध्दतीने रेल्वे इंजिनियर यांना दोषी ठरवून आरोपी केल्याच्या निषेधार्थ रेल्वेतील विविध संघटनांनी मोर्चाचे आयोजन केले. भारतीय रेल्वेतील अधिकृत कामगार संघटना १)सेंट्रर रेल्वे मजदूर संघटना यांनी दि.०६/११/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता तर, २) नॅशनल रेल्वे मजदूर युनियन यांनी दि.०६/११/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांच्या कार्यालयाबाहेर आंदोलन करणार असल्याबाबतचे पत्र छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे पोलीस ठाणे यांना प्राप्त झाले होते. त्याअनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे पोलीस ठाणे यांचेकडून योग्य तो बंदोबस्त लावण्यात आला होता. गुरुवार दिनांक ०६/११/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता सेंट्रर रेल्वे मजदूर संघटना या संघटनेचे डिव्हीजनल सेक्रेटरी यांनी १०० ते २०० कामगारांसह छत्रपती शिवाजी महाराज टर्मीनस, मुंबई येथील मिलन हॉल परिसरात एकत्र येऊन मुंब्रा दुर्घटनेबाबत दाखल करण्यात आलेला गुन्हा रद्द करण्यात यावा व नमूद गुन्हयातील रेल्वे अभियंत्यांना सर्व कायदेशीर मदत पुरविण्यात यावी या मागण्यांसाठी विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयासमोर मोर्चा आंदोलन केले. प्रस्तुत मोर्चा आंदोलन सायंकाळी ५.१५ वाजता समाप्त करण्यात आले.

त्यानंतर मोर्चातील सुमारे ३० ते ४० आंदोलकांनी अचानक सायंकाळी ५.३० वाजता उपनगरी मोटरमन लॉबी तसेच, स्टेशन मास्तर यांच्या कार्यालयासमोर अचानक ठिय्या आंदोलन करुन दरवाजासमोर बसून कोणालाही मोटरमन लॉबीमध्ये व स्टेशन मास्तर ऑफीस मध्ये आत जाऊ देण्यास विरोध केला. आंदोलक यांच्या या कृतीमुळे लोकल गाडयांचे मोटरमन व गार्ड हे त्यांचे कर्तव्यावर जाऊ शकले नाहीत. त्यामुळे सायंकाळी ५.४१ वाजल्यापासून हार्बर लाईन व मेन लाईन मार्गावरील कोणतीही लोकल रवाना होऊ शकली नाही. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकातून लोकल गाड्या बाहेर जात नसल्याने रेल्वे स्थानकाकडे येणाऱ्या लोकल गाड्या देखील थांबून राहील्या व त्यातील प्रवाशी देखील थांबुन राहिले. प्रस्तुत प्रकरणी, पोलीस उप आयुक्त मध्य परिमंडळ, लोहमार्ग मुंबई व ठाणे प्रभारी अधिकारी तसेच, रेल्वे विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी देखील सेंट्रर रेल्वे मजदूर संघटनेच्या आंदोलकांना त्यांच्या बेकायदेशीर कृत्यामुळे, वाहतूक

ठप्प झाल्यामुळे गर्दीवाढत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो याची कल्पना देवून आंदोलकांना सदर ठिकाणाहून निघून जाण्याचे निदेश दिले. त्यानंतर आंदोलक तेथून निघून गेले व सायंकाळी सुमारे ६.३८ वाजल्यानंतर थांबून राहिलेली लोकल वाहतूक हळूहळू सुरु झाली.

छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक येथे झालेल्या आंदोलनामुळे रेल्वे वाहतूक बंद पडून छत्रपती शिवाजी महाराज टर्मीनसहून जाणाऱ्या व येणाऱ्या लोकल गाड्या रेल्वे ट्रॅक मध्येच थांबून राहिल्यामुळे रेल्वे प्रवाशी लोकल गाडीतून उतरुन नजीकच्या स्थानकापर्यंत पोहचण्यासाठी पायी चालत जाऊ लागले. एक लोकल गाडी सॅन्डहर्स्ट रोड ते भायखळा रेल्वे स्थानकाच्या दरम्यान सॅन्डहर्स्ट रोड रेल्वे स्थानकापासून २० मीटर अंतरावर थांबून होती. आंदोलन संपल्यामुळे सायंकाळी सुमारे ७.०० वाजण्याच्या दरम्यान डाऊन अंबरनाथ फास्ट लोकल गाडी सॅन्डहर्स्ट रोड ते भायखळा रेल्वे स्थानकादरम्यान जात असतांना रेल्वे वाहतूक बंद असल्याचे समजून रेल्वे ट्रॅक मध्ये पायी चालत असलेल्या ०५ प्रवाशांना (०२ पुरूष व ०३ महिला) सदर गाडीची ठोकर लागून अपघात घडला. सदर जखमींना जे.जे. रुग्णालय येथे दाखल केले असता, जखमींपैकी ०१ पुरुष व ०१ महिला यांचा मृत्यू झाला असल्याचे घोषित केले. तर इतर ०३ प्रवाशांवर उपचार करण्यात आले. सदर प्रकरणी छत्रपती शिवाजी महाराज पोलीस ठाण्यात अपमृत्यू नोंद क्र.८८/२०२५ व क्र.८९/२०२५ कलम १९४ BNSS प्रमाणे करण्यात आली आहे. त्याची चौकशी चालू आहे.

वास्तविक पाहता, दि.१९/१०/२०२५ ते दि.१७/११/२०२५ पर्यंत भा.ना.सु.सं. २०२३ चे कलम १६३ अन्वये, मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये ०५ व ०५ पेक्षा अधिक व्यक्तींना बेकायदेशीरपणे एकत्र जमण्याचे मनाई आदेश असताना देखील सेंट्रल मजदूर संघ या रेल्वे संघटनेच्या आंदोलकांनी सदर प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करुन, दिनांक ०६/११/२०२५ रोजी सायंकाळी ५.३० ते ६.३८ वाजण्याच्या दरम्यान बेकायदेशीररित्या जमून कर्तव्यावरील उपनगरीय रेल्वे गाडयांचे मोटरमन, गार्ड, उप स्टेशन प्रबंधक व स्टेशन प्रबंधक यांना विरोध करुन, सार्वजनिक कर्तव्य करण्यास अटकाव निर्माण केला. याकरीता पोलीस उपनिरीक्षक महेश कृष्णा पाटील, छत्रपती शिवाजी महाराज टर्मीनस पोलीस ठाणे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली. त्याअनुषंगाने दि.११/११/२०२५ गु.र.नं.८५५/२०२५ कलम बीएनएस २०२३ कलम १८९ (२), १९०, १२७ (२), २२१, २२३ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ (सुधारणा २०१५ ) कलम ३७ (१), १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

सदरहू प्रकरणी महाव्यवस्थापक, विभागीय व्यवस्थापकांनी जबाबदारी स्विकारुन राजीनामा द्यावा आणि अत्यावश्यक सेवा कायद्यानुसार गुन्हा नोंदविण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केंद्रीय रेल्वे मंत्र्यांना पत्राद्वारे करणे तसेच, सदर अपघातानंतर प्रवाशी संघटनेने अनेकवेळा भेटण्याचा प्रयन करुनही भेट नाकारणे हा मुद्दा राज्य शासनाशी संबधीत नसून केंद्रीय रेल्वे मंत्रालयाशी संबधीत आहे.

**********